बुधवार, ९ ऑगस्ट २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●WEDNESDAY 9 AUGUST 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-14 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5

# नऊ वर्षांत नऊ सरकारे पाडली

## खा. सुप्रिया सुळेंचा एनडीएवर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** लोकसभेत राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सरकारच्या नऊ वर्षांच्या कामाचा पाढा वाचून काढला. तसेच एनडीएच्या सरकारने नऊ वर्षांत नऊ सरकारे पाडली आहेत, असा दावा देखील सुप्रिया सुळे यांनी त्यांच्या भाषणत केला आहे. महागाई, बेरोजगारी हे मोदी सरकारचे मोठे अपयश असल्याची टीका करत सुप्रिया सुळे यांनी मोदी सरकारवर निशाणा साधला आहे. तर मोदी सरकार शेतकऱ्यांच्या विरोधात काम करत असल्याचे घणाघात देखील सुप्रिया सुळे यांनी लोकसभेत मोदी सरकारवर केला आहे. लोकसभेत मंगळवारी मणिपूरच्या मुद्द्यावर सरकारच्या विरोधात अविश्वाचा प्रस्ताव मांडण्यात आला. यावेळी सभागृहात खासदार सुप्रिया सुळे यांनी मणिपूरसह अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर भाष्य केले आहे.

वंदे भारत सुरु केली हे चांगलच केले पण त्यासोबत इतर रेल्वे का बंद केल्या असा सवाल सुप्रिया सुळे यांनी सरकारला विचारला आहे. माझ्या मतदारसंघातील तीन रेल्वे स्थानकांवर वंदे भारत थांबते पण त्या स्थानकांवरील इतर रेल्वे या रद्द करण्यात आल्या असल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. तर वंदे भारत ही गरिबांसाठी नसल्याचे म्हणत वंदे भारत ही फक्त पाहता येते त्यामधून प्रवास करणे अशक्य आहे, असे देखील त्यांनी म्हटले आहे. आम्ही सातत्याने रेल्वेचे थांबे वाढवण्याची मागणी करत आहोत पण काही केल्या ती पूर्ण होत नाही, त्यामुळे त्या वंदे भारतचा काही उपयोग नसल्याचे म्हणत सुप्रिया सुळे यांनी सरकारवर निशाणा साधला आहे.

मोदी सरकारने म्हटले होते की चांगले दिवस येतील पण अनेक गोष्टींमध्ये भारत हा खालच्या स्तरावर आला आहे, मग चांगले दिवस कसे आले असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. तर महागाई रोखण्यात मोदी सरकार अपयशी ठरले असल्याचे त्यांनी म्हटले आहे. आतापर्यंत 288 जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे, तेव्हा यांचा सबका साथ सबका विकास सबका प्रयास ही योजना कुठे गेली असा प्रश्न त्यांनी सरकारला विचारला आहे.



**'हे सरकार शेतकऱ्याचे नाही' :** मोदी सरकार शेतकऱ्यांच्या विरोधात काम करत असल्याचा दावा देखील खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन मोदी सरकारने दिले होते पण कोणत्या शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट झाले हे सरकराने आम्हाला सांगवे असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. तर दूध देखील मोदी सरकारमुळे महागले असल्याची टीका त्यांनी केली आहे.



**मणिपूरच्या मुद्द्यावर बरसल्या :** मणिपूरच्या हिंसाचारावर बोलताना सुप्रिया सुळे यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. तसेच मणिपूरच्या मुख्यमंत्र्यांनी राजीनामा देण्याची मागणी करत असल्याचे देखील त्यांनी सांगितले आहे. सध्याच्या मणिपूरच्या परिस्थितीमध्ये सरकार इतके असंवेदनशील कसे काय वागू शकते असा सवाल देखील त्यांनी विचारला आहे.

## महत्त्वाची बातमी

### भर रस्त्यात विकृताने फाडले तरुणीचे कपडे

आधुनिक केसरी न्यूज

**हैदराबाद :** जवाहर नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक संतापजनक घटना घडली आहे. येथील एका विकृताने रस्त्यावरून चालत जाणाऱ्या तरुणीचे कपडे फाडून तिला भररस्त्यावर नग्न केले आहे. रविवारी रात्री साडेआठच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेचा व्हिडीओ समोर आला असून सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. विशेष म्हणजे ही घटना घडत असताना आरोपीची आईही त्याच्याबरोबर होती. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करत आरोपी तरुणासह त्याच्या आईला अटक केली आहे. ही विकृत घटना रस्त्यावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर संताप पसरला आहे. 'एनडीटीव्ही'ने दिलेल्या वृत्तानुसार, पीडित तरुणी एका कपड्याच्या दुकानात काम करते. रविवारी रात्री आठच्या सुमारास दुकानातील काम संपवून ती रस्त्याने चालत आपल्या घरी चालली होती. यावेळी दुचाकीवरून आलेल्या आरोपीनं पीडित तरुणीला चुकीच्या पद्धतीने स्पर्श केला. यावर पीडितेने आक्षेप घेतल्यानंतर विकृत आरोपी आक्रमक झाला आणि त्याने तिचे भररस्त्यावर कपडे फाडून तिला नग्न केले. दरम्यान, रस्त्यावरून जाणाऱ्या अन्य एका महिलेने पीडितेची मदत करत आरोपीला रोखण्याचा प्रयत्न केला. पण आरोपी तिच्यावरही धावून गेला. ही घटना घडत असताना आरोपीच्या दुचाकीवर त्याची आईही होती. तरीही तिने पीडित तरुणीला वाचवण्याचा प्रयत्न केला नाही. या घटनेची माहिती मिळताच पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि आरोपीसह त्याच्या आईला ताब्यात घेतले. पीडित युवतीला मदत मिळेपर्यंत ती रस्त्यावर नग्न अवस्थेत स्वतःचे अंग झाकण्याचा प्रयत्न करत होती.

# हिंदुस्तान हेच माझे घर : राहुल गांधी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांना त्यांचे संसद सदस्यत्व बहाल केल्यानंतर त्यांचा दिल्लीतला १२ तुघलक लेन हा बंगलादेखील परत मिळाला आहे. बंगला परत मिळाल्यानंतर प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी राहुल गांधींना त्यांची प्रतिक्रिया विचारली. त्यावर राहुल गांधी म्हणाले, संपूर्ण हिंदुस्तान हेच माझे घर आहे. राहुल गांधी २००४ साली पहिल्यांदा खासदार म्हणून निवडून आले होते तेव्हा हा बंगला त्यांना देण्यात आला होता. २००४ मध्ये राहुल गांधी यांनी उत्तर प्रदेशातल्या अमेठी मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवली होती.


२००४, २००९ आणि २०१४ अशा तीन लोकसभा निवडणुकांमध्ये राहुल गांधी हे अमेठीतून खासदार म्हणून निवडून आले. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी यांनी अमेठीसह केरळमधल्या वायनाड मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. वायनाडमधून राहुल गाधी विजयी झाले. तर अमेठीत भाजपा उमेदवार स्मृती इराणी यांनी त्यांचा पराभव केला होता. गेल्या १९ वर्षांपासून राहुल गांधी यांचे याच बंगल्यात वास्तव्य आहे.

एप्रिल महिन्यात गुजरात न्यायालयाने राहुल गांधी यांना मोदी आडनावासंदर्भातल्या खटल्यात दोन वर्षांची शिक्षा सुनावल्यानंतर त्यांची खासदारकी रद्द झाली. त्यापाठोपाठ त्यांना सरकारी बंगला रिकामा करण्याची नोटीस बजावण्यात आली. त्याप्रमाणे राहुल गांधी यांनी २२ एप्रिल रोजी हा बंगला रिकामा केला होता. तब्बल तीन महिन्यांनी राहुल गांधी आज या बंगल्यात परतले आहेत.

# सततच्या पावसामुळे नागपुरात डेंग्यूचा प्रकोप

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** पावसामुळे आजाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढते. अशातच एकीकडे पावसाचा जोर वाढत आहे तर दुसरीकडे सततच्या मुसळधार पावसामुळे नागपूरात डेंग्यूचा प्रकोप दिवसेंदिवस वाढतच आहे. वाढत्या रुग्ण संख्येचा विचार करता नागपूरात डेंग्यू हा चांगलाच चिंतेचा विषय बनला आहे. विशेष म्हणजे एकट्या जुलै महिन्यात नागपूरात डेंग्यूचे 80 रुग्ण आढळले आहे. तर चालू वर्षात रुग्णसंख्या 153 वर पोहचली आहे. फक्त नागरी वस्त्याच नाही तर शासकीय कार्यलय देखील डेंग्यूच्या विळख्यात सापडल्याने प्रशासनाच्या चिंतेत भर पडली आहे. डेंग्यूचा वाढता प्रकोप पाहता महानगर पालिकेचे आरोग्य अधिकाऱ्यांनी नागपूर जिल्हा परिषदेला भेट दिली. तेथील एकंदरीत परिस्थिती पाहून त्यांना धक्का बसला. अध्यक्ष, उपाध्यक्ष व सभापती यांच्या सर्वांच्या कार्यालयात पथकाला कुलरच्या पाण्यात डेंग्यूच्या अळ्या सापडल्या. तसेच पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी मंत्र्याचे बंगले तपासले तर तेथे पण पालिकेच्या पथकाला डेंग्यूच्या अळ्या आढळल्या. मागच्या काही दिवसापासून नागपूर मध्ये सतत पाणी कोसळत आहे. त्यामुळे साचलेल्या पाण्याने शहरातील उत्तर व पूर्व नागपूर भागात डेंग्यूचा मोठा प्रकोप पाहायला मिळत आहे. जुलै महिन्यात या भागात डेंग्यूचे 80 रुग्ण आढळले.



नागरी वस्त्यातील वाढती रुग्ण संख्या आधीच नागपूर महानगर पालिका प्रशसयासाठी चिंतेचा विषय बनला असताना शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कामचुकारपणामुळे डेंग्यूचा धोका आणखी वाढला आहे .पालिकेच्या आरोग्य विभागाकडून नागरिकांच्या जनजागृतीचे काम युद्ध पातळीवर केले जात आहे.

**डेंग्यू होण्याची कारणे**

- डेंग्यूची लागण एडिस नावाचा मच्छर चावल्याने होते .
- डेंग्यूचे डास स्वच्छ पाण्यात अंडी देतात आणि त्या अंड्यातून एडिस डासांची उत्पत्ती होते .
- हा एडिस डास दिवसाला चावतो .

**डेंग्यूचा फैलाव होण्याची कारणे**

- घरात कोणत्याही वस्तूत पाणी साठवून ठेऊ नये .
- कूलनमधील पाणी सतत बदलत राहावे .
- लहान मुलांना आणि वृद्धांना अशा दिवसात अंगभर कपडे घालायला द्यावेत .
- ताप आला तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा .
- झोपताना मच्छरदाणीचा वापर करा .
घराचा परिसर स्वच्छ ठेवा
- घरातील फिशटँक , फुलदाणी यातील पाणी वेळोवेळी बदला .
- घरात डास येऊ नयेत याकरता खिडक्यांना जाळ्या लावा .

# रिसोड येथे युरिया खतासाठी लागल्या शेतकऱ्यांच्या रांगा

## प्रत्येकी मिळतात दोनच बॅग : शेतकऱ्यांकडून संताप व्यक्त

आधुनिक केसरी न्यूज


आत्माराम जाधव

रिसोड : यावर्षी तालुक्यात पाऊस लांबल्यामुळे जून महिन्यात होणारी खरीपाची पेरणी तब्बल जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात झाली. पेरण्या पूर्ण झाल्यानंतर पिके बहरात असतानाच रिसोड तालुक्यात अतिवृष्टीने थैमान घातले. परिणामी बहरात असलेली पिके पिवळी पडून त्यांची वाढ खुंतलीआहे. त्यासाठी शेतकऱ्यांना पिकासाठी अत्यावश्यक असणारे युरिया खत मुबलक प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे, युरिया खतासाठी कृषी केंद्रासमोर सकाळच्या सहा वाजता पासूनच शेतकऱ्यांच्या रांगा लागत आहेत. तथापि रांगेत लागूनसुद्धा आधार कार्डवर प्रत्येकी दोनच बॅगा मिळत असल्याने शेतकऱ्यांकडून संताप व्यक्त केल्या जात आहे. युरिया खत हे शेतकऱ्यांसाठी खूप महत्त्वाचे असते. पेरणी झाल्यानंतर अतिप्रमाणात पाऊस झाला की युरिया खताची हमखास मागणी वाढते आणि ऐन त्याच वेळेस दरवर्षी युरियाची टंचाई भासते. हा संयोग म्हणायचा, की जाणीवपूर्वक कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचा प्रयोग समजायचा..? असा संतप्त सवाल शेतकरी करीत आहेत.

मुबलक प्रमाणात युरिया उपलब्ध नसल्याचे कारण पुढे करून, रिसोड शहरात केवळ तीन-चार कृषी केंद्रावरून युरियाची विक्री सुरू आहे. परिणामी खतासाठी झुंबड उडालेल्या शेतकऱ्यांच्या कृषी केंद्र समोर रांगा लागत आहेत. तास न तास रांगेत ताटकळत उभे राहून प्रत्येकी एक किंवा दोन बॅग युरिया मिळत





असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. याबाबत येथील पंचायत समितीचे कृषी अधिकारी एन. एन. जोशी यांच्याशी विचारपूस केली असता, ते म्हणाले दोन, तीन, चार बेगा वाटप होत आहे..! असे उडवा उडवीचे उत्तर देऊन सदर कृषी अधिकारी यांची शेतकऱ्याप्रती असलेली असंवेदना अधोरेखित होते. अशा बेजबाबदार अधिकाऱ्यांकडे वरिष्ठांनी व लोकप्रतिनिधींनी लक्ष देऊन त्यांना, शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी शासन तुमची नेमणूक केली असल्याची जाणीव करून द्यायला पाहिजे, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.



**शेतकऱ्यांची थट्टा :** दोन बॅगा युरिया देऊन शासनाने शेतकऱ्यांची थट्टा चालवली आहे . सद्यस्थितीत शेतकऱ्यांना पिवळी पडलेली पिके व खुंतलेली वाढ यासाठी, युरियाची अत्यंत गरज असतांना मिळालेल्या फक्त दोन बॅगा कोणत्या पिकाला द्याव्या . . ? हा मोठा प्रश्न पडला आहे . या गंभीर बाबीकडे कृषी विभाग लक्ष देत नाही ही अक्षम्य बाब आहे . शेतकरी युरियासाठी वन वन भटकत आहेत याकडे सबंधित प्रशासनाने लक्ष द्यावे . . !
**सचिन इप्पर, ( युवक काँग्रेस, प्रदेश उपाध्यक्ष )**

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

'रामराम हरिभाऊ. पाहुण्यांना घेऊन आलो तुमच्याकडे.' सोपानराव कुंभार बाबाना म्हणाले. 'या की मग. पाव्हणं कुठलं म्हणायचं ? हरिभाऊ म्हणाले. 'हरिभाऊ, हा माझा बालमित्र श्याम. या वहिनी आणि ही त्यांची मुलं पिंकी आणि राजेश. शहरातून आलेत आपला गाव पाहायला.' सोपानराव म्हणाले. 'या मुलांना जरा तुमच्या कामाची माहिती सांगा.' आपल्याला कोणीतरी काही विचारते आहे याचा आनंद होऊन हरिभाऊंची कळी खुलली. ते मोठ्या उत्साहाने सांगू लागले. 'बाळांनो, या कामासाठी आम्ही लई पारखून माती आणतो बरं का ! नदीकाठची किंवा तलावाकाठची माती लागते. त्या मातीला गाळून, वाळवून मग तिच्यात लीद,गवत, शेण, राख, धान्याची फोलपटे यासारख्या गोष्टी मिसळतो. मग ती चांगल्या प्रकारे मुरू देतो. त्यानंतर तिचे गोळे बनवून मग त्याच्या वस्तू घडवतो. हे चाक, यावर आम्ही वस्तुंना आकार देतो. आता तुम्ही ते पाहताच आहात. त्याशिवाय हा एक दगड आहे. त्याला आम्ही गंडा किंवा गुंडा म्हणतो. त्यामुळे वस्तूला गुळगुळीत आकार येतो. ही एक लाकडी थोपटणी, तिला आम्ही चोपणी म्हणतो. वस्तू तयार करताना तिला बाहेरून आम्ही याच्याने थोपटतो. तयार झालेल्या वस्तू आम्ही ज्या भट्टीत भाजतो, तिला आवा म्हणतात.' पोरांनो, आता आमचा धंदा पूर्वीसारखा राहिला नाही. मातीच्या वस्तू लोक कमी विकत घेतात. पण तुम्हाला म्हणून सांगतो. पूर्वी स्वयंपाकासाठी मातीचीच भांडी वापरली जायची. गोरगरिबांच्या घरात स्वयंपाक त्यांच्यावर व्हायचा. पण आता स्टील, अल्युमिनियम यांची भांडी आली. लोकं तीच घेत्यात पण आरोग्यासाठी मातीचीच भांडी चांगली. त्यात पोषक घटक बी असत्यात आन स्वयंपाकाला लई ब्येस चव येते बघा. आणि चुलीवरच्या जेवणाची टेस्ट बी लई न्यारी असतीया.' हरिभाऊ उत्साहाने बोलत होते. बोलता बोलता एकीकडे त्यांचे कामही सुरु होते.' त्यांच्या हातातील ती कला पाहून राजेश आणि पिंकीला आश्चर्य वाटले. ती दोघेही बराच वेळ त्याचं निरीक्षण करत उभी राहिली. 'एकाच प्रकारच्या मातीतून माठ, रांजण, कुंड्या, पणत्या,चुली आदी वस्तू घडत होत्या. ओल्या मातीला हवा तसा आकार देता येतो. त्यातून काय निर्माण करायचे ते आपण ठरवायचे असते. मग भट्टीत भाजली की ती पक्की होतात. मानवी जीवनाला सुद्धा या गोष्टी किती चपखल लागू पडतात, नाही ?' असे विचार श्यामरावांच्या मनात येऊन गेले. श्यामलाताई मनातल्या मनात 'फिरत्या चाकावरती देशी मातीला आकार, विठ्ठला तू वेडा कुंभार' हे गाणं गुणगुणत होत्या.



समृद्ध प्राचीन वारसा

## आनंदी पहाट



### संस्कारक्षम संस्कृतीच श्रेष्ठ

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या अंतर्मनाला संस्कारच शिस्त लावत असतात. एक विशीष्ट आकार, दिशा आणि गती प्राप्त करून देत असतात. मुळातच ह्या विचारांची व्याप्ती आपण समजून घेणे सर्वप्रथम जरुरीचे असते. आपल्या प्रत्येकाच्या जीवनांत अंतर्मानावरील संस्कार खूप महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. त्याशिवाय आपल्या विचारांमध्ये परिपक्वता येतेच

असे नाही. संस्काराशिवाय जीवनमूल्य शून्य ठरत असते. संस्कारच आपल्याला श्रेष्ठ बनवत असतात, उत्तम आकार देत असतात. आपल्या सर्वोत्तम जीवनाचा पाया उत्तम संस्कारांवरच अवलंबून असतो. संस्कारांशिवाय जीवन भरकटलेल्या जहाजाप्रमाणे, विमानाप्रमाणे असते, एकप्रकारे विमनस्क अवस्थेतील मन कोणतीही पातळी गाठू शकते. संस्कार म्हणजे नेमके काय असते ? खरे तर, संस्कार संस्कृतीनेच प्राप्त होत असतात. त्याचप्रमाणे, संस्कृती सुद्धा, संस्कारांवर आधारित असते. संस्कार म्हणजे आपल्या अंतर्मनावर सामाजिकदृष्ट्या महत्वाच्या आणि उपयुक्त ठरतील अशा चांगल्या सवयी, असे म्हणता येईल. आपल्यामध्ये यासाठी आवश्यक ते सद्गुण असणे जरुरीचे असते. अशा गुणांचा केवळ व्यक्तिगत लाभ होत नसतो, तर समाजातील प्रत्येक घटक लाभार्थी ठरत असतो. आपले म्हणून ज्यावेळी आपण एखाद्या व्यक्तीचा अथवा गोष्टीचा मनापासून स्वीकार करतो तेव्हाच त्यांमधील आपला सहभाग वाढत जातो. तुझे-माझे करण्याच्या विचारांमुळे असणारा सहभाग केवळ माझ्या स्वतःशी संबंधित गोष्टींशीच राहतो. आपण सहजीवनाचा एकदा स्वीकार केला तरीही, आपण उगाचच असे करत राहतो. अनेकदा घडणाऱ्या काही घटना, घडामोडी ह्या निसर्गनियमांमुळे सुरु असल्यासारखे वाटते. कदाचित सहभागाचा अभाव असल्याचे ते महत्वाचे कारण असावे. सहभागाचा आनंद हा केवळ त्याची प्रचीती आल्याशिवाय देखील मिळत असतो. आपल्या भागाचे, वाट्याचे, नावचे, कर्तव्याचे भान ठेवून सहजीवनात सहभागी होणे महत्वाचे असते. आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक वातारणाची निर्मिती करत राहणे गरजेचे असते.



आधुनिक केसरी

### आत्मरूप जाण | आद्य स्वामी ||

वेशीवरी उभा | रक्षक देहाचा ||
स्वामी चैतन्याचा | तोच जाण ||१||
कोण प्राण वायू | फुंकी या देहात ||
ये-जा काळजात | त्याची असे ||२||
त्याच्या सत्ते चाले | सृष्टीचा संसार ||
दृष्टीचा व्यापार | भासमय ||३||
अमूर्ताचे रूप | मूर्तात वसते ||
भक्तीत नांदते | छबी त्याची ||४||
काया वाचा मने | जाता तू शरण ||
आत्मरूप जाण | आद्य स्वामी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

समाधये त्वया दत्तं यत्तेनापेक्षितं तथा |
दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम्
|| ६१ || समाधी वैश्याने जसे अपेक्षिले, तसे तू त्याला दिलेस. दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

एक कर्म अरु भक्ति है, यह समझब अज्ञान ।
बोधहीन दलदल फँसे, कर्म भक्ति दो ज्ञान
।।०५।।(स्वर्वेद पंचम मण्डल त्रयोदश अध्याय) ०५/१३/०५

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
कर्म आणि भक्ती एकच आहे असे समजणे अज्ञान आहे. अविवेकी जन अज्ञानाच्या या दलदलीत फसल्याने भक्तीच्या परम विवेकास जाणत नाहीत. कर्म आणि भक्ती ही दोन वेगवेगळी तत्वे आहेत.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## मोक्षलक्षण

आधुनिक केसरी

आत्मा अत्यंत सूक्ष्म आहे व तो सर्व व्यापून शिल्लक रहातो. म्हणून सर्वत्र दिसणारे या अफाट विश्वात प्रत्येक वस्तूला आत्मा आंतबाहेर निरंतर व्यापून आहे. त्याचे वर्णन करण्याचे सामर्थ्य प्रत्यक्ष शेषाच्या अंगी देखील नाही. आत्मा कसा अत्यंत सूक्ष्म आहे व तो सर्व व्यापून आहे हे ज्यांच्या अनुभवास आले त्यांचे जीवपण शिल्लक उरत नाही. त्याचा जीवभाव नाहींसा होतो उपाधीचा ठाव घेऊन ती बाजूला सारली की आत्मा मुळात भेदरहित आहे हे समजते. माणूस जीवपणाने एकदेशी बनतो,संकुचित होतो. मी देह आहे या अहंकाराने त्याला जन्म सोसावे लागतात. जन्म मरणाच्या फेरीत तो अडकून बसतो. जन्ममरणाच्या कचाट्यातून जो सुटला त्याला मोक्ष मिळाला असे समजावे. तत्वांचा शोध घेता घेता माणूस सद्विचारावर चालतो . म्हणजे ब्रम्ह अनुभवतो. आपण स्वतः प्रत्यक्ष परब्रम्हाच आहोत असा या वाक्याचा खरा अर्थ आहे. सतत सन्मानित, सन्मानाने सत्कर्म करत जगावे हेच या निमित्ताने सांगणे आहे. आपल्यात असलेले अज्ञान हे दूर करण्यासाठी ज्ञानपूर्वक विवेकाने देहबुध्दि नाहिशी करून आत्मोन्नती करावी . अज्ञानरूपी रात्र संपवणे व ज्ञानाचा प्रकाश पाडणे हे आपल्याच हातात आहे हेच खरे ना! त्यासाठी सतत सन्मार्गाचा रस्ता धरा. ऊपाधि म्हणजे वरवर घालेले पांघरूण आहे. स्थूल देह व सुक्ष्म देह यापेक्षा आत्मा वेगळा आहे. स्थूल, सुक्ष्म, कारण,महाकारण,हे चार पिंडाचे, आणि विराट,हिरण्यमय, अव्याक्रुत व मूळप्रकुति हे चार व ब्रम्हाडाचे मिळून आठ देह होतात.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## नाम कसे घ्यावे ?

आधुनिक केसरी

नाम कसे घेऊ हे विचारणे म्हणजे, पेढा कसा खाऊ म्हणून विचारण्यासारखे आहे. पेढा कोणत्याही बाजूने खाल्ला तरी गोडच लागतो, तसे नाम कसेही घेतले तरी ते आपले काम करतेच करते. पेढा ज्याने खाल्ला आहे, तो पेढा कसा खाऊ म्हणून जसे विचारणार नाही, तसे नाम घेणारा मनुष्य नाम कसे घेऊ म्हणून विचारणार नाही. शेतात बी पेरतात तेव्हा त्याचे तोंड वरच्या बाजूला आहे की नाही हे पाहात नाहीत. बी शेतात पडते तेव्हा, ज्या तोंडातून मोड यायचा असतो ते तोंड कोणत्यातरी एका बाजूला, खाली किंवा वरही असू शकेल; पण जेव्हा मोड बाहेर पडतो तेव्हा त्याची दिशा मुळात कोणत्याही बाजूला असली तरी तो वळण घेऊन जमिनीतून वरच येतो. तसे, नाम कसेही घेतले तरी घेणाऱ्याची ते योग्य दिशेने प्रगती करून त्याला योग्य मार्गावर आणून सोडील. म्हणून कसेही करून नाम घ्यावे.



नाम घेताना कोणती बैठक असावी, किंवा कोणते आसन घालावे ? हा प्रश्न म्हणजे श्वासोच्छवास करताना कोणत्या तऱ्हेची बैठक असावी असे विचारण्यासारखा आहे. समजा, एखाद्याला दमा झाला आहे, तर तो काय करतो ? तो अशा तऱ्हेने बसण्याचा किंवा पडण्याचा प्रयत्न करतो की, जेणेकरून श्वासोच्छवास कष्टाशिवाय व्हायला मदत होईल; म्हणजे श्वासोच्छवास सुलभ रीतीने कसा चालेल, हे त्याचे ध्येय असते, आणि मग त्याकरिता देहाची बैठक कशीही ठेवावी लागली तरी चालते. श्वासोच्छवास विनाकष्ट चालू ठेवणे हे जसे त्याचे ध्येय असते तसे नाम अखंड कसे चालेल हे आपले ध्येय ठेवावे; आणि त्याला मदत होईल, व्यत्यय येणार नाही, अशा तऱ्हेची कोणतीही बैठक असावी. बैठकीला फार महत्व देऊ नये. समजा, आपण पद्मासन घालून नामस्मरणाला बसलो आणि काही वेळाने पाठीला कळ लागली, तर आपले लक्ष नामापेक्षा देहाकडेच लागेल; म्हणजे नाम घेता घेता देहाचा विसर पडण्याऐवजी देहाची स्मृतीच वाढल्यासारखी होईल. म्हणून नामस्मरणात खंड न व्हावा हे ध्येय ठेवून, त्याला अनुकूल अशी ज्याच्या त्याच्या प्रकृतिधर्माप्रमाणे कोणतीही बैठक ठेवावी. भगवंताच्या नामाला शरीराचे कसलेही बंधन नाही. हेच तर नामाचे माहात्म्य आहे. मनुष्याच्या कोणत्याही अवस्थेमध्ये भगवंताचे स्मरण सहज ठेवता येण्याचे एकच साधन आहे आणि ते म्हणजे त्याचे नाम होय. पण देहबुद्धी अशी आहे की त्या निरूपाधिक नामाला आपण काही तरी उपाधी जोडतो आणि त्या उपाधीवर नाम घेणे अवलंबून ठेवतो; असे न करावे. इतर उपाधी सुखदुःख उत्पन्न करतील, पण नाम निरूपाधिक आनंद देईल.

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

मला करायचेच काही उरले नाही असे ज्याने म्हटले, त्याने सद्गुरू खरोखर केला असे म्हणावे. एखादा सुखवस्तू गृहस्थ 'मी स्वस्थ आहे' असे म्हणतो, पण ते काही खरे नाही. मन जोवर गिरक्या मारते तो पर्यंत तो स्वस्थ आहे असे नाही म्हणता येणार.एक बाप आपल्या मुलाला पोहायला शिकवीत होता. बापाने मुलाला पहिल्या प्रथम घोट्या इतक्या पाण्यात आणले, नंतर ढोपरा इतक्या पाण्यात आणले, नंतर आणखी पुढे आणले; आणि एक दिवस त्याने मुलाला पाण्यात खेचून घेतले. त्या प्रमाणे आपले गुरू आपल्याला परमार्थ शिकवीत असतात. आपण पाण्यात उतरले मात्र पाहिजे. एक लहान मुलगा एका विहिरीजवळ उभा होता. त्याची एक वस्तू आत पडली होती. 'ती काढण्याकरिता मी आत उडी मारतो,' असे तो म्हणू लागला. त्यावर तिथे होता तो एक मनुष्य म्हणाला, 'तू असे करू नकोस, आत पडून बुडून जाशील.' ?क्रमशः

## निवडक सुभाषिते


आधुनिक केसरी

अजरामरवत् प्राज्ञो विद्यामर्थं च साधयेत् ।
गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत् ।।

स्पष्टीकरण - माणसाने आयुष्याच्या अखेरीपर्यंत विद्या आणि घन मिळवीत राहावे.

कारण ती विद्या आपल्या बुद्धीचा विकास करते आणि ते धन सत्कृत्यांसाठी उपयोगी पडते. धर्माचे म्हणजे दानादी पुण्यकृत्यांचे आचरण मात्र तातडीने करावे. कारण मृत्यू आपल्यावर केव्हा घाला घालील याचा नेम नसतो.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे



उणिवांची जाणीव - पुस्तक परीक्षण
पान ६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, ९ ऑगस्ट २०२३


आरती नव्हे; छत्रपतींच्या पराक्रमाचे व कार्याचे पूजन व्हावे
पान ७


# कोकणातील पायाभूत विकासाला प्राधान्य : मुख्यमंत्री

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील जनतेला मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे हे सरकारचे कर्तव्य असून त्यामध्ये रस्त्यांची जोडणी ही महत्त्वपूर्ण बाब आहे. त्या पार्श्भूमीवर कोकणाच्या गतीमान विकासासाठी त्या ठिकाणी दळणवळण सुविधांमध्ये वाढ करण्यास आणि पायाभूत सुविधा उभारण्यास शासनाचे प्राधान्य असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे सांगितले.

रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील एकूण १२ रेल्वे स्थानकांचे रस्ते काँक्रिटीकरण व सुशोभिकरण करणे या कामांचा दूरदृष्यप्रणालीद्वारे भूमिपूजन शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. मंत्रालयात आयोजित या कार्यक्रमास सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे तर संबंधित १२ रेल्वे स्थानकांवर केंद्रीय उद्योग मंत्री नारायण राणे, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, उद्योग मंत्री उदय सामंत, महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांच्यासह लोकप्रतिनिधी, अधिकारी उपस्थित होते.



मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, जनतेच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवण्याच्या दृष्टीने रोजगार, आरोग्य, शिक्षण, दळणवळण यांसह मूलभूत सोयीसुविधा जनसामान्यांना सुलभतेने उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. देशाच्या, राज्याच्या गतीमान विकासात रस्त्यांची व्यापक सुविधा ही महत्त्वाची बाब असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातील आठशे रेल्वे स्थानकांच्या कायापालटाच्या उपक्रमाची अलीकडेच सुरवात केली आहे. राज्यातील ४४ स्थानकांचा त्यात समावेश आहे. त्या पार्श्वभूमीवर कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली, सिंधुदुर्गगरी, कुडाळ आणि सावंतवाडी रेल्वेस्थानक यांना जोडणाऱ्या रस्त्यांच्या काँक्रिटीकरण व सुशोभिकरणाचे काम सुरु होत आहे, ही स्वागर्ताह बाब आहे. यामुळे कोकणाच्या पर्यटनाचा व्यापक विस्तार होण्यासाठी निश्चितच लाभ होईल. पर्यटकांना, स्थानिक रहिवाश्यांना या माध्यमातून चागंल्या सोयी सुविधा उपलब्ध होतील. त्याचसोबत कोकणातील पर्यटनवृद्धीलाही यामुळे मोठी चालना मिळेल. पर्यटन व्यवसायाला पूरक निर्सगसौंदर्याने संपन्न कोकणाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्याठिकाणी पायाभूत सुविधांचा विकास ही काळाची गरज असून, शासनाने कोकण विकासावर लक्ष केंद्रित केले आहे, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले.

**स्थानिक रोजगार संधी विस्तारण्यासाठी रेल्वे स्थानकांचे रस्ते महत्त्वपूर्ण – उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कोकण हे पर्यटनाच्या दृष्टीने सुंदर ठिकाण असून स्थानिक रोजगार संधी विस्तारण्यासाठी कोकणातील बारा रेल्वे स्थानकांच्या रस्ते काँक्रिटकरण व सुशोभीकरणाचे काम निश्चितच उपयुक्त ठरणार आहे . कोकणाच्या गतिमान विकासासाठी त्याठिकाणी पायभूत सुविधांची उभारणी करण्यास शासनाचे प्राधान्य आहे . त्यासाठी स्वतंत्र विकास मंडळ करण्याची मुख्यंत्र्यांची भूमिका आहे . कोकणाला नैसर्गिक साधनसंपत्ती लाभेलली असून त्या ठिकाणच्या या साधनसंपत्तीचा, सागरी किनारे यांचा योग्य वापर झाला पाहिजे . कोकण रेल्वे ही कोकण विकासाची जीवनवाहिनी असून तेथील रेल्व स्थानकांचा कायापालट झाला पाहिजे . पर्यटक, प्रवासी यांच्या सोयीसुविधांमध्ये या माध्यमातून वाढ होणार आहे . त्याचा निश्चितच चांगला परिणाम याठिकाणच्या पर्यटन संधी वाढण्यासाठी होईल . या पार्श्वभूमीवर मंत्री रवींद्र चव्हाण यांनी तत्परतेने सात महिन्यांत ही बारा रेल्वस्थानके, रस्ते सुशोभिकरण संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे . कोकणवासीयांसाठी, चाकरमान्यांसाठी हे निश्चितच उपयुक्त ठरेल . कोकणात सिंचन प्रकल्पनाची कामे ही करण्यात येणार असून काजू फळ प्रक्रिया सोबत वेगवेगळे रोजगारवृद्धीसाठीचे उपक्रम राबवण्यात येत आहेत . या सर्व माध्यमातून लवकरच कोकणाचा लक्षणीय विकास बघायला मिळेल, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले .

# चंद्रपुरातील मूर्ति येथील बहुप्रतीक्षित विमानतळाचा प्रस्ताव फेटाळला

आधुनिक केसरी न्यूज

**श्याम हेडाऊ**

**चंद्रपूर :** रजुरा तालुक्यातील मुर्ती या गावी प्रस्तावित असलेला बहुप्रतीक्षित विमानतळाचा प्रस्ताव केंद्रीय वन सल्लागार समितीने फेटाळला आहे. सदर विमानतळाची प्रस्तावित जागा ही वन्यजीवांच्या अधिवासासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगत विमानतळाचा प्रस्ताव फेटाळण्यात आला आहे. वन सल्लागार समिती ही केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालयाची वैधानिक संस्था आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील प्रस्तावित विमानतळाच्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी समितीची 7 जुलै रोजी बैठक झाली. या बैठकीत समितीने विमानतळाचा हा प्रस्ताव फेटाळला. महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी समितीसमोर प्रस्ताव मंजूर करून घेण्यासाठी बरेच प्रयत्न केले, परंतु समितीने वन्य प्राण्यांचा अधिवास लक्षात घेता त्यांची बाजू मान्य केली नाही. विमानतळासाठी प्रस्तावित केलेली जागा ही वन्यप्राण्यांचे महत्त्वाचे अधिवास असून येथे विमानतळ उभारल्यास मानवी हस्तक्षेप वाढेल, असा युक्तिवाद समितीने केला. विशेष म्हणजे राज्याचे वनमंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार हे चंद्रपूर जिल्ह्यात विमानतळासाठी अनेक वर्षांपासून सातत्याने प्रयत्नशील आहेत. अथक प्रयत्नांनंतर त्यांनी विमानतळासाठी राजुरा तालुक्यातील विहीरगाव-मूर्तीजवळील जमीन विमानतळासाठी निश्चित केली होती. या प्रस्तावित विमानतळासाठी 63 हजार हेक्टरहून अधिक वनजमीन विमानतळाकरीता वळवावी लागणार आहे. मात्र, ज्या भागात हे विमानतळ प्रस्तावित आहे, त्या भागात वाघ आणि इतर वन्य प्राण्यांचा वावर आहे. तसेच जिल्ह्यातील नव्याने निर्माण झालेले कान्हळगाव अभयारण्य हे विमानतळाच्या प्रस्तावित जागेपासून जवळ आहे. विमानतळामुळे परिसरातील वाघांच्या नैसर्गिक कॉरिडॉरला धोका निर्माण होऊ शकतो, असे कारण देत समितीने अहवाल फेटाळला. त्यामुळे आता चंद्रपूरात विमानतळ होणार की नाही ? वनमंत्र्यांचे विमानतळाचे हे स्वप्न ते आता कसे पुर्ण करतात ? याकडे चंद्रपूरकरांचे लक्ष लागले आहे.




# किली मंजारोवर फडकणार तिरंगा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दक्षिण अफ्रिका ख़ंडातील टांझानिया मधिल जगातील सर्वाधीक उंच फ्री-स्टँडिंग पर्वत तसेच पायापासून 19,298 फूट उंचीवर असलेला जगातील चौथा सर्वात उंच पर्वत किली मंजारोवर भारतीय स्वातंत्र्य दिन १५ आँगस्ट रोजी भारतीय राष्ट्रध्वज तिरंगा फडकविण्या करीता छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत कार्यरत दत्ता रामदास सरोदे व त्यांचे सहकारी विनोद विभुते हे दिनांक ८ आँगस्ट २०२३ रोजी मुंबईहुन टांझानिया कडे विमानाने प्रस्थान करीत आहेत. आंतरराष्ट्रीय प्रसिद्ध ट्रेकर तसेच एव्हरेस्टवीर आनंद बनसोडे यांच्या मार्गदर्शन खाली त्यांच्या ३६० एक्सप्लोरर या संस्थे मार्फत शहरातील गिर्यारोहक रवाना होत आहे.

सदर गिर्यारोहक यांना आयुक्त जी.श्रीकांत यांनी समिट पुर्ण होण्या करीता शुभेच्छा दिल्या. सदर मोहीमेस एव्हरेस्ट वीर आनंद बनसोडे आणि एव्हरेस्ट वीर मनिषा वाघमारे तसेच इंडियन कँडेट फोर्सचे कमांडर विनोद नरवडे सर यांनी ही शुभेच्छा दिल्या. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासकजी. श्रीकांत यांनी दत्ता सरोदे व त्यांचे सहकारी विभुते यांच्याकडे किली मंजारो शिखरावर १५ ऑगस्ट रोजी राष्ट्रध्वज फडकविण्या करीता तिरंगा सुपुर्द करून त्यांना साहसी व अत्यंत खडतर मोहीमेस शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले. सदर गिर्यारोहक यांना मोहीमे करीता निरोप देण्या करीता दुर्गप्रेमीचे जगन्नाथ राऊत , गणेश सोनी, डॉ. प्रशांत काळे,अमोल भोईटे, डोडल,राजेंद्र बोकन दौड, संजय खांडेकर तसेच इंडियन कँडेट फोर्सचे किशोर नावकर,राहुल अहीरे, सुरज सुलाने, शोएब पठाण,मनिष पहाडीया,विशाल काकडे, देशपांडे सर्व सदस्य उपस्थित होते.




# आठ महाविद्यालयांना आरोग्य विद्यापीठाची संलग्नता

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे सात वैद्यकीय आणि एका दंत महाविद्यालयातर्फे त्रुटी पूर्तता करण्याबाबत हमीपत्र सादर करण्यात आल्याने या महाविद्यालयांना संलग्नता देण्यात आली आहे. या महाविद्यालयांच्या एकूण एक हजार जागांसाठी प्रवेश घेणे शक्य होणार आहे. विद्यापीठाचे प्रति-कुलगुरु डॉ. मिलिंद निकुंभ यांनी यासंदर्भात माहिती दिली. सदर महाविद्यालयांकडे अपुरी शिक्षकसंख्या असल्याने संलग्नतेबद्दल अडचण निर्माण झाली होती. महाविद्यालयांमार्फत प्रतिनिधींनी आवश्यक असणाऱ्या शिक्षक संख्येच्या पूर्ततेबद्दल कार्यवाही करण्याचे हमीपत्र विद्यापीठाकडे सादर केले. विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन विद्यापीठातर्फे सदर महाविद्यालयांना संलग्नता दिली असल्याचे डॉ. निकुंभ यांनी सांगितले. कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ यांनी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाला विद्यापीठातर्फे महाविद्यालय आणि त्यांच्या प्रवेश क्षमतेबद्दल कल्पना देण्यात आल्याचे सांगितले.

# कृषी विभाग, आत्मा यंत्रणा यांच्या संयुक्त विद्यमाने रानभाजी महोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यात दि. ०९ ऑगस्ट २०२३ रोजी बचत भवन सभागृह पंचायत समिती सोयगाव येथे 'रानभाजी महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. या रानभाज्या महोत्सवामध्ये वैयक्तिक महिला, महिला बचत गट, शेतकरी गटांचा सहभाग घेतला जाणार असून येथे उत्कृष्ट रानभाज्यांचे नमुने आणणाऱ्या व रानभाज्यांची चांगल्या प्रकारे भाजी तयार करण्याची पाककृती ( रेसीपी ) करणाऱ्या महिलांना प्रशस्तीपत्र दिले जाणार आहे. रानभाज्यांचे उत्कृष्ट नमुने व उत्कृष्ट पाककृतीची ( रेसीपी ) निवड करण्यासाठी तज्ज्ञांची समिती गठीत करण्यात आली आहे.

पावसाळा सुरु झाला की शेतात, रानावनात शेकडोने रानभाज्या उगवतात. करटोली, घोळ, आंबुशी कुर्डु, केना, सुरण, दिंडा, कुडा, टाकळा, पाथ्री, भुईआवळी, कपाळफोडी, तरोटा, आगडा, उंबर, चिगुर, सराटे, मयाळू अशा किती तरी रानभाज्यांची नावे सांगता येतील. आपल्या पूर्वजांना या सर्व रानभाज्या माहिती होत्या व त्यांची भाजी कशी तयार करावयाची यांच्या पद्धतीपण माहिती होत्या. आताच्या पिढींना या भाज्यांची ओळखही नाही व त्यापासून भाजी कशी बनवायची याची माहिती नाही. आपल्या पूर्वजांचा हा ठेवा लुप्त होतो की काय, याची शंका निर्माण होते. या रानभाज्यांचे वैशिष्ट्य म्हणजे या भाज्या कुठल्याही रासायनिक खत अथवा किटकनाशकांचा वापर न केलेल्या असतात. याचबरोबर त्या चविष्ठ, आरोग्यदायी असतात. अनेक प्रकारचे औषधी गुणधर्म या रानभाज्यांमध्ये आहेत. या भाज्यांमध्ये ऋतुमानाप्रमाणे आहारात बदलपण करता येतो. अशा या रानभाज्यांची ओळख व्हावी, त्यांची पाककृती ( रेसीपी ) नविन पिढीला माहित व्हावी, या रानभाज्यांच्या विक्रीस चालना मिळावी व ग्रामीण लोकांना आर्थिक उत्पन्नाचे साधन निर्माण व्हावे. या उद्देशाने कृषि विभाग व आत्मा व यंत्रणा यांच्या संयुक्त विद्यमाने बचत भवन सभागृह पंचायत समिती सोयगाव रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे.



या ठिकाणी अनेक शेतकरी, शेतकरी गट रानभाज्या विक्रीसाठी घेऊन येणार आहेत. तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी रानभाज्याचे नमुने, त्यांच्या पाककृतीसह बचत भवन सभागृह पंचायत समिती सोयगाव येथे दि. ०९ ऑगस्ट रोजी सकाळी ठीक १० वाजेपर्यंत हजर रहावे. तसेच रानभाज्या महोत्सवामध्ये वेगवेगळ्या रानभाज्या पहायला तर मिळणार आहेतच परंतु त्यांची विक्रीपण होणार आहे. याचबरोबर भाजीपाल्याच्या पाककृतीचे प्रात्यक्षिकही तेथे दाखविले जाणार आहे. फेसबुक व युट्युब वर लाईव्ह दाखविले जाणार आहे. त्यामुळे रानभाज्या महोत्सवामध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन तालुका कृषि अधिकारी सोयगाव मदन सिसोदिया यांनी केले आहे.

# रंजन गोगोईंचे भाषण

आधुनिक केसरी

अयोध्येतील राम मंदिर खटल्यात ऐतिहासिक निकाल ज्यांच्या खंडपीठाने दिला, ते माजी सरन्यायाधीश रंजन गोगोई आता राज्यसभेचे नामनियुक्त खासदार आहेत. सोमवारी रंजन गोगोईंनी २०२०मध्ये राज्यसभेत खासदार झाल्यापासूनचे आपले पहिले भाषण केले. देशाच्या माजी सरन्यायाधीशांच्या भाषणाकडे सर्व सदस्यांसह देशाच्या कायदे क्षेत्राचेही लक्ष होते. माझ्या पहिल्याच भाषणात माझ्या अत्यंत जिव्हाळ्याच्या मुद्द्यावर बोलायची संधी मिळाल्यामुळे हा माझ्यासाठी फार मोठा दिवस आहे, असे रंजन गोगोई आपल्या भाषणाच्या सुरुवातीला म्हणाले. माझे पहिले भाषण असल्यामुळे सभापती महोदय नियम थोडे शिथिल करून मला वेळ देतील अशी अपेक्षा आहे. पण मी फार वेळ घेणार नाही, असे रंजन गोगोईंनी म्हणताच सभागृहात हास्याचे लकेर उमटली! दरम्यान, रंजन गोगोई यांनी दिल्ली सेवा विधेयकाच्या (NCT Bill) समर्थनार्थ भूमिका मांडताना या विधेयकामुळे राज्यघटनेच्या मूलभूत चौकटीला तडा जात असल्याची विरोधकांची टीका फेटाळून लावली. हे विधेयक घटनेच्या मूलभूत चौकटीला धक्का लावतं का? देशाचे माजी सॉलिसिटर जनरल अंध्यारूजिना यांनी केशवानंद भारती खटल्यावर(१९७३) एक पुस्तक लिहिले आहे. ते पुस्तक वाचल्यानंतर माझे असे मत आहे की न्यायशास्त्राच्या मुलभूत तत्त्वांचा विचार करता घटनेचा मूळ पाया असलेल्या तत्त्वप्रणालीबाबत मतमतांतरे असू शकतात, असे रंजन गोगोई आपल्या भाषणात म्हणाले. देशाच्या माजी सरन्यायाधीशांनी राज्यघटनेच्याच मूलभूत चौकटीबाबत अशा पद्धतीने प्रश्नचिन्ह उपस्थित करणारं विधान करणं चर्चेचा विषय ठरले आहे. विशेष म्हणजे रंजन गोगोई सरन्यायाधीश पदावर असताना अनेक महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये त्यांनी राज्यघटनेच्या याच मूलभूत चौकटीचा हवाला देत आपले निर्णय दिले आहेत.२०१९च्या नोव्हेंबर महिन्यात रंजन गोगोईंनी घटनेच्या मूलभूत चौकटीचे उल्लंघन करणारा लवादांची पुनर्रचना करणारा कायदा रद्द ठरवला होता. "सर्वोच्च न्यायालयाने अधिकारांची विभागणी हा घटनेच्या मूलभूत चौकटीचा महत्त्वाचा भाग असल्याचा उल्लेख केशवानंद भारती वि. केरळ सरकार व इतर अनेक खटल्यांमध्ये केला आहे, असे रंजन गोगोईंनी म्हटले होत. २०१९मध्ये जेव्हा सरन्यायाधीशांच्या कार्यालयाला माहिती अधिकारांतर्गत आणण्याचा निकाल देतानाही रंजन गोगोईंनी घटनेच्या मूलभूत चौकटीचा दाखला दिला होता. भारतीय न्यायव्यवस्थेचं स्वातंत्र्य हा घटनेच्या मूलभूत चौकटीचाच एक भाग आहे हे आता स्पष्ट झाले आहे, असे रंजन गोगोई तेव्हा म्हणाले होते.

# नांदेड महापालिका असून वळंबा...



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

**परकियांनी आपल्यावर अन्याय-अत्याचार केले म्हणून स्वातंत्र्य प्राप्तीसाठी आम जनता पेटून उठली व अन्याया विरोधात लढली म्हणून तुम्हीआम्ही सर्वजण आज स्वातंत्र्याचा श्वास घेत आहोत. वर्तमानात अन्याय-अत्याचारला विरोध करणारी पिढी शिल्लक आहे की नाही हा माझ्यासारख्या संघर्षशील माणसासमोर मोठा प्रश्न उभा आहे. आपण स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत असताना शासन व प्रशासनातर्फे आपल्या हक्काच्या किमान गरजा भागवू शकत नाही तर यालाच शाश्वत विकास म्हणवा काय ? अशा या अंध:कारमय स्वातंत्र्याप्रती मला एक शेर आठवला तो असा, औलाद अगर लायक निकले तो कमाने की जरुरत नही, अगर नालायक निकली तो रखने कि जरुरत नही ।**

असे म्हणतात ते अगदी वर्तमानातील शासकीय यंत्रणा असो अथवा प्रशासकीय अगदीच खरे आहे. सामान्य प्रश्नासाठी असो अथवा समाजाच्या शाश्वत विकासाठी येथे कुणालाही, जनतेलासुद्धा त्याचे काही एक देणेघेणे उरले नाही. प्रत्येकजण येथे स्वतःसाठी जगतो आहे. जनतेला अथवा समाजाला विकासाचे कांहीच देणेघेणे उरलेले नाही. आपल्या अशा बेजबाबदार, निष्क्रीय व षंढ मनोवृत्तीमुळे दिवसेंदिवस समाजात अन्याय अत्याचार वाढत आहेत. तमाम शासकीय व प्रशासकीय यंत्रणा आज वतनदारासारखी निर्ढावलेली आहे. वर्तमानात सर्वत्र अन्याय अत्याचारा विरोधात संघर्ष करणारे बोटावर मोजण्या इतकेच शिल्लक आहेत. असे जर दिवसेंदिवस चालत राहिले तर आपलेच आपल्याला गिळंकृत करतील तेथे इतरांची गरज भासणार नाही.


मी हे सर्व पोटतिडकीने प्रखर वास्तव आपल्या समोर मांडत आहे. हे वाचुन-परखून तरी आपल्यातला माणूस म्हणून म्हणवणार जिवंतपणा जिवंत होईल म्हणूनच ही धडपड आहे. अन्याय अत्याचाराचे लिखाण करण्यासाठी असंख्य विषय आहेत त्याचा उहापोह मी वेळोवेळी करतोच. त्यापैकी एक म्हणजे आपल्या नांदेड शहराचे पालिकेतून महापालिकेत रुपांतर झाले त्याचा मागच्या पंचविस वर्षाचा आनंददायी इतिहास, मी आनंददायी हा शब्द शासन व प्रशासनकर्त्यांसाठी वापरतो आम जनतेसाठी मात्र "बित गये वो दिन अच्छे थे" असे सर्वसामान्य जनतेला सहज वाटते. नगरपालिकसारख छोटं घर सोडून आपण आज महापालिकेत रुपांतर झालेल्या मोठ्या सुविधा युक्त प्रशस्त घरात प्रवेश करत आहोत तेव्हा आपण सर्वार्थाने सुखी होवून आपले जिवन आनंददायी होईल असे वाटले होते पण झाले भलतेच महापालिका नावाचे मोठे घर तुम्हा आम्हा सर्वांना खायला उठले की काय ? अशी अवस्था नांदेड शहर वासियांची झाली आहे मग अशा प्रशस्त घराची आपणास गरज काय ? आपली पूर्वीची झोपडीच बरी म्हणन्याची वेळ सद्या या महापलिकेतील राज्यकर्त्यांसह प्रशासनकर्त्यांनी आपणावर आणली आहे. विकास या सोज्वळ तीन अक्षरी शब्दामुळे विकासाची कल्पना कुठे हवेत विरली याचा मागच्या पंचविस वर्षापासून आपणस थांग पत्ता ही लागत नाही. नेहमीच येतो पावसाळी प्रमाणे दर पाच वर्षांनी महापालिकेतही निवडणुका होतात. विकासाची तीच तीच आश्वासने फक्त निवडणूकीपुर्ती, एरवी असंख्य पोकळ आश्वासनांवर तुम्ही आम्ही समाधानी राहून नेत्यांना पाचवर्षे पूर्ण करण्याची संधी देतो. पुन्हा निवडणुका अल्याकी




"सब कुछ मॅनेज्ड" होऊन जैसे थे स्थिती आपण दैनंदिन अनुभवतो. सुज्ञ, बुद्धिवान, प्रामाणिक, मेहनती लोकांचे राजकाणातून पळपुटे धोरण व "नोट लेकर वोट करने" ही सामान्यांची मानसीकता यासह अनेक बाबी याला कारणीभूत असल्यामूळे सत्तेत सत्तांतर होण्याऐवजी "बोतल वही सिर्फ लेबल बदला" या प्रमाणे वर्तमान राजकारणाची वाटचाल सुरू आहे. त्याला स्थानिक राजकारणही अपवाद नाही. मागच्या पंचवीस वर्षात नांदेड महापालिकेतील एकहाती काँग्रेस राजवटीत महापौरासह कित्त्येक प्रशासनकर्ते आले आणि गेले पण या सर्वांनीच तुम्हा आम्हा सर्वांना केवळ आश्वासनाची खैरात देवून गपचूप केले. मागील पंचवीस वर्षाच्या काँग्रेसी राजवटीत नांदेंड शहराचा काय आणि कसा विकास झाला याचे चित्र आपण नेहमीच बघत असतो. विकासाच्या नावाखाली हे सर्वजण रंकाचे राव झाले. तुम्ही आम्ही सर्वजण मात्र साधारण बाबींसाठी नेहमीच वंचित व उपेक्षीत राहीलोत. हीच यांच्या विकासाची संकल्पना आहे काय ? नांदेड महापालिकेतील शासन व प्रशासनकर्त्यांच्या बेफीकीर आणि बेजबबादार वृत्तीमुळे या वर्षीच्या पहिल्या पावसात संपूर्ण नांदेड जलमय झाल्यामुळे होत्याचे नव्हते झाले. याला कोणाला जबाबदार धरावे ? मित्र हो, आपले नांदेड शहर व जिल्ह्यासह अनेक समस्यांनी ग्रस्त असलेले शहर बनले आहे. शहर व जिल्हा समस्यांचा पाढा खूप मोठा असल्यामूळे मी याठिकाणी कांही निवडक समस्यां आपल्या समोर ठेवत आहे. १ ) मागच्या पंचविस वर्षापासून नांदेडकरांना स्वच्छ पिण्याजोगे पाणी मिळत नाही. २ ) अनेक महापौर व आयुक्त आले आणि गेले पण दिवसें दिवस जटील होत असलेली शहरातील वाहतुकीची समस्या कुणी सोडवली नाही. ३ ) स्वच्छते बाबत तर महापालिकेतर्फे करोडो रुपयांचा निधी खर्च होतो तरी पण शहर कांही स्वच्छ होत नाही. ४ ) शिक्षण व वैद्यकीय सेवेचे बाजारीकरण झाल्यामुळे शहरवासीयांना अव्वाच्या सव्वा पैसे मोजून अशा सुविधा उपलब्ध करून घ्यावा लागातात. ५ ) सहकारी आणि खाजगी कारखाने व शिक्षण संस्था पुढाऱ्यांच्या खिशात असल्यामुळे सामान्य कामगार कष्टकरी वर्गाला मोठ्या शहराकडे धाव घ्यावी लागते. ६ ) शहरातील अनाधिकृत बांधकामामुळे शहराचे विद्रुपीकरण होऊन शहराचे सौंदर्य नष्ट होत आहे. अशा अनेक समस्यांनी आपले नांदेड शहर ग्रासलेले असताना मागील पंचवीस वर्षातील महापालिकाप्रशासन व सत्ताधाऱ्यानी काय शाश्वत उपाययोजना करून नांदेड करांचे हिताचे व जिव्हाळ्याचे कोणते प्रश्न सोडविले याचे मुल्यमापन होणे गरजेचे आहे. शिवाय महापालिकेतील राज्यकर्ते व प्रशासनकर्ते यांच्याकडून मूळ नांदेड शहरालाच सर्व सुविधा रस्ते, नाल्या, ड्रेनेज लाईन, स्वच्छ पाणी देऊ शकत नसतील तर आजूबाजूचा ग्रामीण भाग महापालिकेत समावून घेण्याचा घाट कशाला ?.

वाढत्या शहरीकरणामुळे जनसामान्यांच्यामते ही महापालिका विसर्जीत करून नांदेड उत्तर आणि दक्षिणसाठी स्वतंत्र "अ" वर्गाची नगरपालीका अस्तित्वात आणून जनसामान्यांला लागणाऱ्या शाश्वत मुलभूत सोई-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात असा नांदेडकरांचा आग्रह आहे. एकंदरीत नांदेड महापालिका शासन व प्रशासनाला लागलेली हि मोठी वाळवी असल्यामूळे येणाऱ्या निवडणुकीत शहरवासीयांनी प्रामाणिक, चारित्र्यसंपन्न व शहराच्या विकासाप्रती कायम संवेदनशील राहणाऱ्या उमेदवारांनाच निवडून द्यावे अन्यथा ही वाळवी संपणार नाही. नांदेड महापलिका अक्सर झुटी है । और हमेशा जनता इनसे रुठी है ।।

# युवापिढी ऑनलाइन जुगाराच्या विळख्यात



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे आणि या तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल ही जीवनावश्यक गरज बनली आहे. आजची तरुण पिढी मोबाईलच्या इतकी आहारी गेली आहे की या तरुणांना मोबाईलचे व्यसनच जडले आहे. आज प्रत्येक तरुणाकडे स्मार्टफोन आहे. या स्मार्टफोनमध्ये इंटरनेटवर चालणारे अनेक प्रकारचे गेम असतात. या गेमने तरुणांना अक्षरशः वेड लावले आहे. कॅण्डी क्रश, ब्ल्यू व्हेल, अँग्री बर्ड, पोकोमेन, पब्जी असे ऑनलाइन गेम इंटरनेटवर धुमाकूळ घालत आहेत. ऑनलाइन रमी गेम हा देखील त्यापैकीच एक गेम. या ऑनलाइन रमी गेमच्या विळख्यात तरुणाई अडकली आहे.**

ऑनलाइन रमी गेम खेळण्याचे वेड तरुण पिढीला आर्थिक नुकसान करणारे ठरत आहे. मोबाईलवर खेळला जाणारा हा गेम म्हणजे एकप्रकारचा जुगाराच आहे. हातात असलेल्या मोबाईलवर ऑनलाइन रमी खेळण्याचे अनेक एप्लिकेशन उपलब्ध आहेत. घरी, शेतात, नोकरी, व्यवसायाच्या ठिकाणी अनेकजण एकत्र येऊन ऑनलाइन रमी खेळताना दिसत आहे. ऑनलाइन रमी हा एकप्रकारचा जुगार असून या जुगारात तरुण पिढी पुरती अडकली असून त्यांना त्यातून बाहेर काढण्याऐवजी चित्रपट तारे आणि क्रिकेट खेळणारे खेळाडू या ऑनलाइन रमी गेमची टीव्हीवर जाहिरात करून तरुण पिढीला जुगारच्या गर्तेत ढकलत आहे. चित्रपट तारे असोत की क्रिकेटपटू हे तरुणांचे आयडॉल असतात. त्यांच्या सर्व गोष्टींचे तरुण मुले अनुकरण करत असतात म्हणूनच ऑनलाइन रमी चालवणाऱ्या कंपन्या या सिलिब्रेटींना करोडो रुपये देऊन आपली जाहिरात करायला लावतात मात्र या सिलिब्रेटींनी आपण पैशासाठी तरुण पिढीला कोणत्या मार्गावर नेत आहोत याचा विचार करावा. केवळ पैसे कमावणे हा सिलिब्रेटींचा उद्देश नसावा सामाजिक दायित्व देखील तितकेच महत्वाचे आहे. चित्रपट तारे आणि क्रिकेटर यांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून ऑनलाइन रमीच्या जाहिराती बंद कराव्यात. ऑनलाइन जुगारच्या विळख्यात अडकल्याने तरुणांना मोठ्या आर्थिक नुकसानिस सामोरे जावे लागत आहे. ऑनलाइन रमी गेमच्या नादाला लागून अनेकजण कंगाल झाले आहेत. ऑनलाइन रमी गेममुळे अनेक कुटुंबे उध्वस्त होत आहेत. ऑनलाइन रमी गेमच्या विळख्यात अडकल्याने अनेक कुटुंबे बेघर झाले आहेत. ऑनलाइन रमी खेळून अनेक तरुण कर्जबाजारी झाली आहेत. ही कर्जे फेडण्यासाठी पालकांनी आपली घरे व शेती विकली आहे.

सहज पैसे कमवण्याचे आमिष दाखवून लोकांच्या घामाची कमाई लुटली जात आहे. ऑनलाइन रमी खेळताना पैसे हरल्याने तरुणांमध्ये नैराश्य येत आहे. यातून काही तरुणांनी आत्महत्या देखील केल्या आहेत. या गेममुळे हिंसाचार देखील वाढला आहे. दक्षिणेकडच्या राज्यांनी ऑनलाइन गेमवर बंदी घातली आहे. कर्नाटक सरकारने तसा कायदाच केला आहे. केरळ, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा राज्यातही ऑनलाइन रमीवर बंदी आहे. पुरोगामी महाराष्ट्रात मात्र अजूनही ऑनलाइन रमीवर बंदी नाही. नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनात देखील हा प्रश्न चर्चेत आला होता मात्र न्यायालयाने ऑनलाइन रमीवर बंदी घालण्यास नकार दिल्याचे सरकारतर्फे सांगण्यात आले. न्यायालयाने जरी ऑनलाइन



रमीवर बंदी घालण्यास नकार दिला असला तरी महाराष्ट्र सरकारने अध्यादेश काढून तसा कायदा करावा. सरकारकडे प्रचंड बहुमत आहे शिवाय विरोधी पक्ष देखील या अध्यादेशाला पाठिंबाच देतील त्यामुळे अध्यादेश काढून ऑनलाइन रमीवर बंदी घालण्याचा कायदा महाराष्ट्र सरकारला करता येऊ शकतो. राज्यातील तरुणांना ऑनलाइन रमी या जुगारातून वाचवायचे असेल आणि तरुणांना ऑनलाइन जुगारच्या विळख्यातून सोडवायचे असेल तर महाराष्ट्र सरकारने ऑनलाइन रमीवर बंदी घालणारा कायदा करायलाच हवा.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# मसापने जागविल्या ना. धों. महानोरांच्या आठवणी

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** शेती, माती, रानातील सौंदर्य हेरून आपल्यातील प्रतिभेने त्यास पैलू पाडणारे निसर्गकवी पद्मश्री ना. धों. महानोर हे निसर्गाने स्वतःच्या सौंदर्याचे वर्णन करण्यासाठी मराठी साहित्यास आभाळ भरून दिलेले दान होते. पूर्वी ठराविक शहरांपर्यंत मर्यादित असलेल्या साहित्य, कला, कवितांना त्यांनी नवा मार्ग दाखविला. नामांकित गायक, गायिकांना मातीतले शब्द जशास तसे म्हणण्याचा आग्रह धरून नवा शृंगार महानोर यांनी निर्माण केला आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवायचे असतील तर महानोरांचे साहित्य, त्यांनी शेतीत केलेले प्रयोग समजून घ्यावे लागतील.

पुढच्या पिढीस ना. धों. महानोर समजावून सांगणे मोठे आव्हान असून ते पेलावेच लागेल अशा भावना जालन्यातील साहित्यरसिकांनी श्रद्धांजली सभेत व्यक्त केल्या. मराठवाडा साहित्य परिषद जालना शाखेतर्फे यशवंत नगर परिसरातील विठ्ठल- रुक्मिणी मंदिरातील सभागृहात शनिवारी ( ता. 5 ) जे. ई. एस.चे प्रशासकीय अधिकारी डॉ. जवाहर काबरा यांच्या अध्यक्षतेखाली श्रद्धांजली सभा घेण्यात आली. ज्येष्ठ पत्रकार अंकुशराव देशमुख, इंजि. एस. एन. कुलकर्णी, मसाप जालना शाखेचे अध्यक्ष प्रा. रमेश भुतेकर, सचिव पंडितराव तडेगावकर यांची या वेळी प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी अ. भा. साने गुरुजी कथामालेचे जिल्हाध्यक्ष डॉ. सुहास सदाव्रते यांनी कवितांचे चालते-बोलते विद्यापीठ असलेले ना. धों. महानोर चार- चार तास कविता सादर करत, मराठी साहित्यात "हिरव्या बोलीची भाषा" हा नवीन साहित्य प्रवाह त्यांनी रूढ केला असून कवी म्हणून ते मनामनात घर करतात, असे नमूद केले. कवी विनोद जैतमहाल म्हणाले की, निसर्गास कवितेतून समाजप्रबोधन करावेसे वाटले तेव्हा संत तुकाराम यांना जन्मास घातले, तर स्वतःच्या सौंदर्याचे वर्णन करण्यासाठी ना. धों. महानोरांना पाठविले. "अंग झिम्माड झालं, सकवार, सैराट" असे नवीन शब्द त्यांनी मराठी साहित्यास दिले असून बैठकीच्या लावणीत शेतातील डौलदार पिकांचा शृंगार मांडला असे नमूद करत "आज उदास उदास दूर पांगल्या सावल्या" या कवितेचे गायन करून विनोद जैतमहाल यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

मसाप जालनाचे अध्यक्ष प्रा. रमेश भुतेकर यांनी "विदूषक, जैत रे जैत, अजिंठा, सर्जा, उंबरठा" अशा चित्रपटांची बहारदार गीते लिहिणारे ना. धों. महानोर यांच्यासोबत मराठवाडा साहित्य संमेलनातील आठवणींना उजाळा देत मसापतर्फे सप्ताहभर त्यांच्या साहित्यकृतींवर उपक्रम राबवणार असल्याचे प्रा. भुतेकर यांनी स्पष्ट केले. प्रा. मधुकर जोशी म्हणाले की, महापुरुषांचे निधन होत नाही, तर ते शब्दरूपाने सृष्टीत कायम राहतात. पुढील कवींसाठी ना. धों. यांनी प्रतिभेचे दान मागितले. पुढच्या पिढीला त्यांच्या गीतांची पारायणे करावी लागतील अशा भावना प्रा. जोशी यांनी व्यक्त केल्या.

डॉ. जवाहर काबरा यांनी शेती, शेतकऱ्यांच्या समस्यांवर अनेक आयोग गठित होतात, त्यांच्या अहवालात केवळ तपशील असतो, शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवायचे असतील तर ना. धों. महानोर यांनी लिहिलेले कृषी साहित्य समजून घ्यावे लागेल, अशी अपेक्षा व्यक्त केली. अंकुशराव देशमुख म्हणाले की, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शरद पवार यांनी ना. धों. महानोरांना स्वीकारले. त्यांच्या लिखाणाने जगात वेगळा आदर्श निर्माण केला असून सीताफळाची नवी जात त्यांनी शोधून काढली असे देशमुख यांनी सांगितले. मसापचे सचिव पंडितराव तडेगावकर यांनी "मी मराठीसाठीच जन्माला आलो" ही भूमिका ना. धों. महानोर यांनी शेवटपर्यंत जोपासली. विधिमंडळात साहित्यिक आणि शेतकऱ्यांचे प्रश्न मांडणारे ते पहिले लोकप्रतिनिधी होते. त्या काळी ना. धों. नी सांगितलेली "जलयुक्त शिवार" योजना आज शासन साकारत असल्याचे तडेगावकर यांनी नमूद केले. डॉ. प्रभाकर शेळके यांनी ना. धों. महानोरांसोबतच्या पत्राचा ठेवा जतन केला असून मातीचे शब्द झेलत कवितेला आभाळभर त्यांनी दिले असे सांगितले.

डॉ. सुधाकर जाधव म्हणाले की, शेतकरी पोशाखात वावरणाऱ्या ना. धों. महानोरांनी गाव पातळीवरचे वास्तव जगणे साहित्यात चितारले असून विद्यार्थीदशेपासून आपल्या आठवणींना त्यांनी उजाळा दिला. प्रणिती लव्हटे यांनी जिवंतपणी साहित्यिकांचे साहित्य वृत्तपत्रांतून प्रसिद्ध व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

सी. ए. गोविंदप्रसाद मुंदडा, एस. एन. कुलकर्णी, प्रा. साहेबराव पोपळघट, प्रा. बाबुराव श्रीरामे, जगत घुगे, संतोष धारे, अर्जुन डोईफोडे यांनी मनोगते व्यक्त केली. आशीष रसाळ यांनी आभार मानले. या वेळी संतोष लव्हटे, बाबासाहेब तरवटे, भरत वानखेडे, लक्ष्मीकांत दाभाडकर, प्रकाश कुंडलकर, प्रा. श्रीराम देशमुख, प्रा. पी. एन. हुंबे, सुभाष भवर, कवी आकाश देशमुख, दिनेश शेळके, गणेश कंटुले, ॲड. अशोक तारडे, गणेश खरात, राजाराम जाधव, रामेश्वर पवार आदींची उपस्थिती होती.

# यंदाही पीओपी गणेश मूर्तींवर बंदी

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राज्यभरात गणेशोत्सवाचीजोरदार तयारी सुरु असताना परत एकदा पीओपीचा मुद्दा चर्चेला आला आहे. यंदा सुद्धा पीओपीच्या मूर्तींवर बंदीच आहे. राज्य सरकारने त्यासाठी एक अस्थायी धोरणही तयार केले आहे, अशी माहिती राज्य सरकारने सोमवारी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दिली आहे.

उच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेत ही जनहित याचिका दाखल केली आहे. राज्याच्या पर्यावरण आणि हवामान बदल विभागाच्या उप सचिवांनी उच्च न्यायालयात शपथपत्र सादर केले. त्यानुसार, पीओपीच्या समस्येवर राज्याच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक नवीन समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती प्रदूषण करणारे घटक पीओपीतून हटवून त्याद्वारे मूर्ती तयार करणे शक्य आहे की नाही याबाबतचा आपला अहवाल तीन महिन्यांत राज्य सरकारला सादर करणार आहे. याशिवाय राज्य सरकारने ऑगस्ट 2022 मध्ये जारी केलेले तात्पुरते धोरण कायमस्वरुपी लागू करायचे की बदलायचे, या मुद्द्यावरही ही समिती आपले मत मांडणार आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य सरकारने हे धोरण स्वीकारले. सण पर्यावरणपूरक पद्धतीने साजरे व्हावेत, यासाठी सर्व स्थानिक स्वराज संस्था तसेच जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत, असंही शपथपत्रात म्हटले आहे. आता अवघा काही महिन्यांवर येऊन ठेपलाय. गणेशमंडळांना पीओपीच्या नियमांबाबत मोठा दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून 'प्लॅस्टर ऑफ पॅरिस'ला पर्याय सुचवण्याबाबत गाईडलाइन अद्याप जाहीर झाली नसल्याने मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना या वर्षी चार फुटांवरील गणेशमूर्ती 'पीओपी'ची वापरता येणार आहे. पण, 4 फुटांखाली मूर्ती मात्र शाडूच्याच मातीची असणं बंधनकारक असणार आहे. दरम्यान, मुंबई महानगरपालिकेकडून मूर्तीकार आणि मूर्ती विक्रेत्यांसाठी 'एक खिडकी' पद्धतीने ऑनलाईन नोंदणीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

# शैलजा दराडे यांना पोलीस कोठडी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** शिक्षण विभागात नोकरी लावण्याच्या आमिषाने ४४ जणांची तब्बल पाच कोटींची फसवणूक केल्याप्रकरणी राज्य परीक्षा परिषदेच्या तत्कालीन आयुक्त शैलजा रामचंद्र दराडे यांना न्यायालयाने १२ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

याप्रकरणात शैलजा दराडे यांच्यासह त्यांचा भाऊ दादासाहेब रामचंद्र दराडे ( रा. इंदापूर ) यांच्याविरुद्ध हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोपट सुखदेव सूर्यवंशी ( रा. खाणजोडवाडी, आटपाडी, सांगली ) यांनी फिर्याद दिली आहे. शैलजा दराडे यांना सोमवारी सायंकाळी हडपसर पोलिसांनी अटक केली. त्यानंतर मंगळवारी शिवाजीनगर न्यायालयात हजर करण्यात आले. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी पोलीस कोठडी देण्याची विनंती सरकार पक्षाकडून करण्यात आली. न्यायालयाने त्यांना १२ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. सूर्यवंशी हे शिक्षक असून, त्यांच्या नात्यातील महिलेला शिक्षक पदावर नोकरीसाठी ते प्रयत्न करत होते. जून २०१९ मध्ये सूर्यवंशी यांची दादासाहेब दराडे याच्याशी भेट झाली.



















# उणिवांची जाणीव - पुस्तक परीक्षण

आधुनिक केसरी

**जीवनाकडे सकारात्मकरित्या बघायला नवा दृष्टीकोन देणारे पुस्तक "उणिवांची जाणीव" हे विद्यावाचस्पती विद्यानंद ह्यांचे पुस्तक वाचले. अतिशय सुंदर शब्दात त्या पुस्तकातील आशयाची मांडणी केल्याचे आढळते. आपण पाहतो, आपल्या सभोवताली नकारात्मकता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. मग ते आपले विचार असोत वर्तन असो व व्यवहार. परिणामी मानसिक स्वास्थ्य बिघडते. बरेच जण डिप्रेशन मध्ये जातात. प्रसार माध्यमांमध्येही उदा. टीव्ही, रेडीओ वर्तमानपत्र इत्यादीतही तसेच आढळते. स्वतःशी संवाद साधून आपल्यातील बलस्थाने अथवा उणिवा जाणण्याचा प्रयत्नही अत्यल्पच. आपण ज्या व्यक्तीजवळ हक्काने मन मोकळे करतो, तीच व्यक्ती त्याचे भांडवल करते; तेव्हा खूपच निराशात्मक वातावरण तयार होते. ह्या पुस्तकात लेखक विद्यानंद ह्यांनी प्रत्येक व्यक्तीमध्ये असलेल्या उणिवांकडे न पाहता तिच्यातील गुण पाहिले तर आपले व्यक्तिमत्व निश्चितच उच्च दर्जाचे होते, ह्याबद्दल अतिशय सुंदर वर्णन केले आहे.**

प्रज्ञावंत कोणाला म्हणावे, केवळ पदव्या घेऊन प्रज्ञावंत होत नसते, तर स्वतंत्र बुद्धी, विचार करण्याची प्रगत क्षमता, कुतूहल, विवेक, तर्कशुद्ध आणि सर्जनशील विचार तसेच तीव्र संवेदनशीलता असणारी व्यक्ती म्हणजे प्रज्ञावान; खूपच सुंदर व्याख्या वाटली. अधिकाराचा व्यापार ह्यावरही अत्यंत सुंदर वर्णन आढळते. मन म्हणजे काय, हे ही जाणून घेणे किती महत्वाचे, ह्यावरही त्यांनी प्रकाश टाकलेला दिसतो. कुंडलीतील ग्रहांपेक्षा स्वतःच्या कुंडलिनीला जागृत केले तर आपण अधिक शक्तिवान होऊन आपले विचार, वर्तन व व्यवहार ह्यात बदल दिसतो. आपण जेव्हा एखाद्या कृतीत सहभाग घेतो तेव्हा तो कसा, काय, किती, कोठे, का, कशासाठी अशा प्रश्नांचा शोध न घेताच आवड व भावनिकता ह्यातून सहभागी होतो. परंतू तसे न होता म्हणजेच ग्लॅमरपेक्षा कृतीतील ग्रामर शिकले पाहिजे ह्यावरही त्यांनी खूप सुंदर प्रकाश टाकला आहे.

पूर्वी नमस्काराची पद्धत होती. त्यातून एक छान नाते निर्माण होत असे. अलीकडे त्यालाही वेगळेच वळण लागलेले दिसते. मनोभावे केलेला नमस्कार समोरच्यालाच नव्हे, तर आपल्यालाही उभारी देतो. सकारात्मक वातावरण निर्माण होऊन एक वेगळा आनंद प्रस्थापित होतो. जेव्हा आपण नेतृत्व करतो; त्यावेळी सगळ्यांना समान संधी, प्रत्येकाच्या मताला किंमत दिल्याने एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण होऊन नेतृत्वाच्या वर्तन आणि व्यवहारात ते परावर्तीत होते; ते कसे, ह्याचेही सुंदर वर्णन लेखकाने केले आहे.

जेव्हा आपण एखादे करिअर निवडतो, त्यावेळी ते निवडण्यामागच्या बाबी समजून घेतल्या, तर त्या करिअरमध्ये आपल्याला स्थिरता आणि आत्मिक आनंद मिळतो. परिणामी यशस्विता आपोआप प्राप्त होते. आज नोकरी देणाऱ्यांनी काढलेली दुकाने, त्यासाठी ते घेत असलेला पैसा आणि नोकरी करणाऱ्याची मानसिकता ह्यात फसवणूकच मोठ्या प्रमाणात होतांना दिसते. ती आपण कशी टाळू शकतो, त्याचेही मार्मिक वर्णन ह्या पुस्तकात आढळते. जयंती, पुण्यतिथी साजरी करतांना त्या मागच्या हेतूची जाणीव, जीवनातील प्रवास आणि त्यात मिळणाऱ्या संधी ह्याबाबत जागरुकता ठेवली, तर जीवन प्रवास यशस्वी होतो. आजच्या जगात बांधिलकीचे ज्ञान व भान ह्याचा अभाव घर, दार, नोकरी, समाज सगळीकडेच बघायला मिळतो. प्रत्येक व्यक्ती स्पर्धेच्या युगात स्वतःचा फायदा बघण्याकडे कल ठेवते. त्यामुळे लेखकाने त्या संदभार्त केलेले विवेचनही खूप उपयुक्त वाटते. आज आपण पाहतो प्रलोभनांचे युग; जिव्हाळा, आपुलकी, प्रेम ह्याला महत्व न देता पैसाच केंद्रस्थानी मानला जातो आणि प्रलोभनांच्या चक्रव्यूहात माणूस अडकतो. प्रलोभनांना दूर कसे ठेवावे, ह्याबाबतचे वर्णनही लेखकाने सुंदर केले आहे. भ्रम आणि संभ्रम ह्यात फरक करून भ्रमात न राहता संभ्रम दूर करून जगण्यापलीकडची अनुभूती कशी घ्यावी, ह्याचेही विवेचन अतिशय छान मांडले आहे.

इतरांपेक्षा मी वेगळा, चांगला, बुद्धिमान इत्यादी बाबींचा अहंभाव तयार होऊन इर्षेचे जीवन व्यक्ती जगते. तेव्हा चांगल्या वाईट गोष्टींची पारख करता आली पाहिजे. वाईटांच्या संगतीत न जाता श्रेष्ठांच्या संगतीत राहून आपला कायापालट कसा करता येईल, ह्याचे भान कसे ठेवावे, ह्याचेही उत्तम उदाहरण त्यांनी वर्णिलेले आहे. लग्न म्हणजे दोन व्यक्तींचा मिलाफ असतो; त्यात तुझे माझे काहीच नसते, हे भान आजच्या पिढीत दिसत नाही. परिणामी निर्माण होणारे क्लॅशेश आणि त्यातून उध्वस्त होणारी कुटुंबे आपण पाहतो. तेव्हा भोगवादी संस्कृतीचे अनुकरण न करता आपल्या सकारात्मक सहजीवनाचा आदर्श प्रत्येकाने निर्माण करायला हवा. पालकांचा पैसा विनाकारण वाया न घालवता स्वतःला सिद्ध करून प्रसिद्ध कसे व्हावे, ह्याचेही महत्व लेखकाने छान स्पष्ट केले आहे.




सणांचे महत्व आणि संस्कृती जपण्याचे भान प्रत्येकाला असावे. सत्तेची समीकरणे सोडविताना अभ्यासपूर्वक विचार, वर्तन आणि व्यवहार करावा. संवादाआभावी निर्माण होणारे गैरसमज वादात रुपांतरीत होतात, त्यामुळे आपले कुटुंब, मित्र परिवार, नातेवाईक इत्यादींबरोबर संवाद साधून आपण आपले संबंध मजबूत करायला हवे. प्रत्येक दिवस संपल्यानंतर आपल्या आयुष्यातील नवीन दिवसांची पहाट उगवते. तेव्हा प्रत्येक दिवसाची सुरुवात सकारात्मक विचारांनी करून आपला आनंद, सुख आणि समाधान व्दिगुणित करावे, ह्याबाबतही लेखक एकदम मार्मिक शब्दात लिहितात.

आज समाजात निर्माण झालेली अशांतता, हरवलेली नैतिकता, व्यक्तीस समजून घेण्याचा अभाव कुटुंबाची ओळख, शाश्वत व्यक्तिमत्व विकास इत्यादी गोष्टी साधण्यासाठी श्री. विद्यावाचस्पती विद्यानंद ह्यांनी समाजाचे ऋण फेडण्यासाठी लिहिलेले हे पुस्तक एक विचारवंत लेखकाचा परिचय करून देते. सदर पुस्तकाचे आकाशवाणीवरून वाचन झाल्यास ते जनसामान्यांपर्यंत पोहोचेल जी आज काळजी आहे, विशेषतः शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ह्याचा परिचय व्हावा असे वाटते. सदर पुस्तक लेखनाबद्दल ह्या विचारवंत लेखकाचे आभार मानून मी थांबते.

**प्रा. डॉ. कविता साळुंके, संचालिका,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा यशवंतराव
चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

# गर्भलिंग निदानास प्रतिबंध करुया !



सचिन कोरडे
संपर्क क्र. 9021920906

आधुनिक केसरी

**स्त्रीला अनंत काळजी माता म्हणून संबोधले जात असतांनाच याच स्त्रीला आज आपल्या जन्मासाठी आणि अस्तीत्वासाठी लढावे लागत आहे. स्त्री आणि पुरुष हे एकाच रथाची दोन चाके आहेत. या देशात जे महापुरुष होवून गेले, त्यांना जन्म देणारी आणि त्यांच्यावर संस्कार करणारी ही स्त्रीच आहे. " स्वामी तिन्ही जगाचा,आई विना भिकारी " अस स्त्रीच स्थान श्रेष्ठ असतांना अज्ञानापोटी स्त्रीचा जन्म नाकारण्याची जणू परंपरा समाजामध्ये वाढत आहे.**

ही बाब समाजासाठी अत्यंत चिंतेची आहे. ज्या सोनोग्राफी सेंटरवर महिला सोनोग्राफी करण्यासाठी येतात. अशा सोनोग्राफी सेंटरच्या डॉक्टरांनी महिलांचे प्रबोधन केले पाहिजे.

डॉक्टरांनीच सोनोग्राफी करणाऱ्या महिलेला व तिच्या नातेवाईकांना लिंग परिक्षण करणे कसे चुकीचे आहे हे समजावून सांगितले पाहिजे.त्यांना गर्भपाताचे धोके कसे आहे,हे पटवून सांगावे. स्त्री जन्माचे महत्व त्यांना पटवून दिले पाहिजे. प्रसुतीपूर्व निदान तंत्राद्वारे गर्भधारणेपूर्वी किंवा नंतर जनुकीय विकृती किंवा गुणसुत्रातील विकृत जन्मतः व्यंग किंवा लिंग संबंधित विकृतीचे निदान व त्याच्या गर्भाच्या लिंग निवड व त्यानंतर स्त्री गर्भ भ्रुणहत्या अशा दुरपयोगास प्रतिबंध करण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे.या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी समुचित प्राधिकरण व सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली आहे. सल्लागार समिती सदस्यांमध्ये स्त्री रोगतज्ञ बालरोग तज्ञ, क्ष-किरण तज्ञ व मेडिकल जेनेटिस्ट यापैकी एक तज्ञ, एक कायदा तज्ञ, जिल्हा माहिती अधिकारी,तीन सामाजिक कार्यकर्ते यामध्ये एकापेक्षा जास्त महिला संघटनेतील प्रतिनिधींचा समावेश आहे. गर्भधारणापूर्वी व प्रसुतीपूर्व निदान तंत्राचा गर्भाचे लिंग निदान करुन व स्त्री गर्भ भ्रुणहत्येसाठी वापरास प्रतिबंध, प्रसुतीपुर्व निदान तंत्राचा उपयोग लिंग निदानासाठी करणाऱ्या जाहिरातीस प्रतिबंध, प्रसुतीपूर्व निदान तंत्राचा विशिष्ट जनुकीय व्यंग किंवा विकृती निदानासाठी वापर करण्यासाठी परवानगी व नियंत्रण अशा तंत्राच्या वापरासाठी नोंदणीकृत संस्थांनाच फक्त परवानगी या कायद्यानुसार देण्यात येते. कायद्यातील तरतुदीचा भंग केल्यास शिक्षेची तरतूद आहे.

सल्लागार समिती ही जनुकीय समुपदेशन केंद्र,जनुकीय प्रयोगशाळा, जनुकीय चिकित्सा केंद्र,सोनोग्राफी केंद्र यांना मान्यता देणे,बरखास्त करणे किंवा नोंदणी रद्द करणे, सोनोग्राफी केंद्रासाठी प्रमाणित केलेल्या निकषांची अंमलबजावणी करणे,कायद्यातील नियमाच्या तरतुदीचा भंग होत असल्यास तक्रारींची दखल घेवून तपास करणे व त्वरीत कार्यवाही करणे,नोंदणी रद्द करण्यासाठी सल्लागार समितीचा सल्ला घेणे व त्यावर विचार करणे, लिंग निवड तंत्राचा व्यक्तीकडून कुठेही दूरूपयोग उपयोग होत असल्यास त्या व्यक्तीविरुध्द कायदेशीर कारवाई करणे,लिंग निदानासाठी वापराच्या प्रथेविरुध्द समाजात जागरुकता निर्माण करणे,कायदा व त्यातील नियमांच्या अंमलबजावणीवर देखरेख करणे,नियमातील तांत्रिक किंवा सामाजिक अटीबाबत सुधारणा असल्यास त्याबाबत केंद्रीय बोर्ड किंवा राज्य बोर्डाकडे शिफारस करणे, सल्लागार समितीने केलेल्या शिफारसीवर कार्यवाही करणे, समुचित प्राधिकरण पुर्ण चौकशी करुन व अर्जदाराने नियमातंर्गत अटी पुर्ण केल्याबद्दल समाधानी झाल्यावर व सल्लागार समितीच्या सल्ल्याप्रमाणे स्वतंत्रपणे किंवा संयुक्तरीत्या जनुकीय समुपदेशन केंद्र,प्रयोगशाळा व सोनोग्राफी केंद्रांना नोंदणी प्रमाणपत्र देवू शकते.चौकशीअंती अर्जदारास त्यांचे म्हणणे सांगण्याची संधी दिल्यावर व सल्लागार समितीच्या सल्ल्याचा आदर राखून अर्जदाराने कायद्यानुसार आवश्यक अटीचे पालन न केल्याचे वाटले तर त्या कायद्याचा लेखी उल्लेख करुन समुचित प्राधिकरण अर्ज नामंजूर करु शकते. संयुक्तीक कारण देवून समुचित प्राधिकरण स्वतः किंवा तक्रारीच्या आधारे त्या केंद्राचे नोंदणी प्रमाणपत्र का रद्द करण्यात येवू नये अशी विचारणा कारणे दाखवा नोटीसद्वारे करु शकते. केंद्राचे म्हणणे ऐकूण घेण्यासाठी पुरेशी संधी दिल्यावर व सल्लागार समितीच्या सल्ल्यानुसार केंद्राने कायद्यातील तरतुदीचा भंग केल्याबाबत समाधानी असेल तर पुर्वग्रह न बाळगता अशा-केंद्राचे नोंदणी प्रमाणपत्र विशिष्ट कालावधीसाठी किंवा पुर्णपणे रद्द करु शकते. समुचित प्राधिकरण सार्वजनिक हिताच्या दृष्टीने कारणांचा लेखी निर्देश करुन कोणतीही पूर्वसूचना न देता केंद्राचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करु शकते.या कायद्याचा भंग झाल्यास त्या व्यक्तीस तीन वर्षाचा कारावास व 10 हजार रुपयापर्यंतच्या दंडास पात्र ठरतो.प्राधिकरण रजिस्टर मेडिकल प्रॅक्टीक्शनरचे नांव स्टेट मेडिकल कौन्सीलला नोंदणीपत्र रद्द करण्यासाठी कळवते.जर आरोप सिध्द झाला असेल तर कौन्सीलच्या रजिस्टरमधून पाच वर्षाकरीता पहिल्या गुन्हयासाठी व पुढील गुन्हयासाठी कायमस्वरुपी नांव काढण्यात येते.जर एखादी व्यक्ती गरोदर स्त्रीवर लिंग निवडीसाठी प्रसवपूर्व निदान तंत्राची मदत घेत असेल तर ती व्यक्ती तीन वर्षापर्यंत कारावासास व ५० हजार रुपये तंत्राची पहिल्या गुन्हयासाठी व पाच वर्षापर्यंत कारावासास व १ लाख रुपयांपर्यंत दंडास पुढील गुन्हयासाठी पात्र ठरते. या अधिनियमातील प्रत्येक गुन्हा दखलपात्र,अजामीनपात्र व नॉन कंपाउंडेबल असेल.संबंधित समुचित प्राधिकरण केंद्र किंवा राज्य शासनाने असे अधिकार दिलेला अधिकारी यांनी तक्रार केल्याशिवाय अशा गुन्हयाची दखल कोणतेही कोर्ट घेत नाही. महानगर दंडाधिकारी किंवा वर्ग १ चे न्यायदंडाधिकाऱ्याशिवाय इतर कोणत्याही न्यायालयात अशा गुन्हयाबाबत खटला चालविला जात नाही. एखादी व्यक्ती किमान १५ दिवस मुदत घेवून गुन्हयाबाबत प्राधिकरणास त्याच्या अखत्यारीतील संबंधित नोंदीच्या प्रती सादर करण्यास न्यायालय आदेश देवू शकते. नोंदणीकृत केंद्राने आपल्या केंद्राचे रेकॉर्डस्, रिपोटर्स,संमतीपत्रे,प्रमाणित केलेले सर्व रेकॉर्डस् दोन वर्षापर्यंत जपून ठेवावे लागतात. केंद्राविरुध्द गुन्हेगारी स्वरुपाचे किंवा इतर खटले दाखल केलेले असतील तर अशा केंद्रातील सर्व नोंदी संबंधित कागदपत्रे खटल्याचा अंतिम निकाल लागेपर्यत जपून ठेवावी लागतात. गर्भधारणापूर्व व प्रसुतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ सुधारित २००३ चे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती/ केंद्र/ संस्था व तसेच या कायद्यातील कलम २२ नुसार जाहिराती करणाऱ्या व्यक्ती/ पुस्तके/प्रकाशक/संपादक/ वितरक इत्यादींची माहिती समुचित प्राधिकाऱ्यांना मिळणे आवश्यक आहे. अशी माहिती संबंधित समुचित प्राधिकाऱ्यांना प्रथमतः देणाऱ्या व्यक्तीस त्याने दिलेल्या बातमीची/ माहितीची समूचित प्राधिकऱ्यामार्फत खातरजमा करून संबंधित सोनोग्राफी केंद्रावर/व्यक्तीवर न्यायालयीन प्रकरण दाखल केल्यावर संबंधित व्यक्तीस १ लाख रुपये इतकी रक्कम बक्षीस म्हणून देण्यात येते.

बेकायदेशीरपणे लिंगनिदान व गर्भपात होत असल्यास हेल्पलाइन क्रमांक १८००२३३४४७५ तसेच www.amchimulgi.gov.in या संकेतस्थळावर देखील तक्रार नोंदविता येते.राष्ट्रीय लोकसंख्या धोरणाचा मुख्य उद्देश लोकसंख्या नियंत्रण हा आहे.यामागे सर्वांगीण विकास करुन स्त्री-पुरुष प्रमाण समतोल करणे हा देखील एक उद्देश आहे. प्रसवपूर्व निदान तंत्र कायद्यात २००२ मध्ये दुरुस्ती होवून हा कायदा १४ फेब्रुवारी २००३ पासून अस्तित्वात आला. याला गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा असे नांव देण्यात आले आहे. गर्भलिंग निदान तंत्राचा दुरुपयोग होवून,गर्भलिंग निदान करुन मुलीचा गर्भ असल्यास तो नाहीसा केला जातो.या प्रकाराला आळा बसावा व त्याद्वारे समाजातील स्त्री-पुरुष प्रमाणातील असमतोल दूर व्हावा,हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे.



# दादा कोंडके

आधुनिक केसरी

कृष्णा कोंडके ऊर्फ दादा कोंडके (८ ऑगस्ट, इ.स. १९३२ ; भोर, पुणे - १४ मार्च, इ.स. १९९८ ; मुंबई, महाराष्ट्र) हे मराठी अभिनेते व चित्रपट-निर्माते होते. त्यांनी मराठी वगनाट्यातून व चित्रपटांतून अभिनय केला. द्वि-अर्थी, विनोदी ढंगातील संवादफेकीमुळे त्यांच्या भूमिका लोकप्रिय झाल्या. अभिनयासोबतच त्यांनी प्रामुख्याने मराठी भाषेत तसेच हिंदी आणि गुजराती भाषेतील चित्रपटांची निर्मिती केली.

दादा कोंडके हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. व्हाईट कॉलर्ड (पांढरपेशा) वर्गाला त्यांच्या कमरेखालच्या विनोदांनी त्यांच्या सिनेमांपासून दूरच ठेवले. पण पिटातल्या प्रेक्षकांनी त्यांना जे डोक्यावर उचलून घेतले त्यानेच त्यांची कारकीर्द यशस्वी करवली. द्विअर्थी विनोदाकडे झुकणारे संवाद, चित्रपटातल्या तारिकेशी पडद्यावरची नको तितकी घसट व ह्या सर्वांमुळे सतत सेन्सॉर बोर्डाशी उडणारे खटके/वादंग ह्यांनी त्यांच्या चित्रपटांना सतत निगेटिव्ह प्रसिद्धी मिळत राहिली....... पिटातल्या प्रेक्षकांना ह्या सर्वांशी काही देणे घेणे नव्हते. दादांचा प्रेक्षक वर्ग ठरलेला असे. दूरदर्शन अस्तित्वात नसलेल्या काळात - दिवसभर घाम गाळून विरंगुळ्याच्या चार क्षणांसाठी पिटात शिट्या वाजवत 'गंगू'च्या तंगड्यांची चर्चा करणारा वर्ग हा त्यांच्या चित्रपटांचा 'मायबाप' होता. ८ ऑगस्ट १९३२ला जन्मलेल्या दादा कोंडकेंचे खरे नांव कृष्णा कोंडके होते. नायगाव - मुंबईच्या मिलमजूर कामगाराच्या घरात गोकुळाष्टमीला जन्मलेल्या ह्या "कृष्णा" ने नावाचे सार्थक मराठी चित्रपट सृष्टीच्या पडद्यावर दाखवून दिले. बॅंड पथकातून सुरुवात करून हळूहळू वगनाट्ये, नाटके ह्यांनी सुरुवात केलेल्या दादांचे चित्रपट जीवन मेहनतीने साकारले गेले. नाटकांच्या निमित्ताने केलेल्या राज्यभराच्या दौऱ्यांनी दादांना सर्वसामान्यांसाठी करमणुकीचे महत्त्व व कोसा-कोसांवर बदलत जाणारी रसिकता कळली व हेच पुढे त्यांच्या यशाचे गमक सिद्ध झाले. दादांची अवघी कारकीर्द वादग्रस्त होती.. सेन्सॉरच्या दंडेलीपुढे नमते न घेण्याची प्रवृत्ती किंवा नियमाविरुद्ध जाण्याची खुमखुमी; त्यांची शिवसेनेशी बांधीलकी; त्यांचे प्रणय; त्यांचे व्यक्तिगत आयुष्य ते मृत्यूनंतर उठलेले वाद हे एका वादग्रस्त चरित्राचे पैलू असावेत. कायद्याने ते विवाहित होते व तेजस्विनी नावाची त्यांना कन्या होती. पण जनमानसांत ते अविवाहित म्हणून वावरले. मार्च १४, १९९८ रोजी पहाटे ३.३०ला रमा निवास ह्या दादरच्या निवासस्थानी त्यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यांना बाजूच्याच सुश्रूषा नर्सिंग होममध्ये हालवण्यात आले. आदल्याच दिवशी त्यांचे स्नेही डॉ. अनिल वाकणकरांनी त्यांना तपासले होते पण शेवटी त्यांचे सुश्रूषा हॉस्पिटलात प्राणोत्क्रमण झाले. त्यावेळी त्यांची मोठी बहीण लीलाबाई मोरे हयात होत्या. पुतण्या विजय कोंडकेंनी त्यांच्यावर अंतिम संस्कार केले... मृत्यूनंतरही वादांनी दादांचा पिच्छा पुरवला. वाद होता दादांच्या वारसा हक्कांबाबत. दादांनी मृत्युपत्रात आपली संपत्तीची कार्यवाह म्हणून एक संस्था स्थापन केली होती / करायला सांगितले होते. विश्वस्त म्हणून उषा चव्हाण, डॉ. अनिल वाकणकर, साबीर शेख ( त्या काळचे कामगार मंत्री ), गजानन शिर्के व वसंत भालेकरांचा समावेश होता. पुढे दादांच्या वारसांनी त्यांच्या मृत्युपत्राला न्यायालयात आव्हान दिले व त्यांची सर्व संपत्ती वादग्रस्त ठरली. दादा कोंडकेंची जन्मतिथी कृष्णाष्टमी, तारीख ८ ऑगस्ट आहे..




**शाहीर माधव बैलकवाड, ता. नायगाव, जि. नांदेड**

# आरती नव्हे; छत्रपतींच्या पराक्रमाचे व कार्याचे पूजन व्हावे

आधुनिक केसरी

**अलीकडच्या काळात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आरती चे फॅड सर्वत्र पसरलेले दिसत आहे.सोशल मीडियावर देखील छत्रपती शिवाजी महाराज यांची आरती चांगलीच व्हायरल होते आहे. लग्नसमारंभात तर वर- वधू च्या हातात पूजेचे ताट देऊन वर-वधू च्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांची आरती केल्या जात आहे. विशेष म्हणजे लग्नसमारंभात आरती साठी सर्वांना उभे करुन, पादत्राणे काढून टाळ्या वाजवत आरती म्हणायला लावल्या जात आहे.यावेळी वातावरण अगदी भक्तिमय झालेलं असतं. वेगवेगळ्या देवांचा अवतार छत्रपती शिवाजी महाराज यांना ठरविल्या जाते.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080



वास्तविक छत्रपती शिवाजी महाराज हे प्रचंड विज्ञानवादी होते,प्रयत्नवादी होते.त्यांनी ज्या लढाया केल्या त्या बहुतांश अमावस्येच्या रात्रीच केलेल्या आहेत. असे असतांना छत्रपती शिवाजी महाराज यांना देवत्व प्राप्त करून दिल्या जात आहे.यामुळे येणाऱ्या पिढीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्यां पराक्रमाला आणि त्यांच्या कार्याला चमत्कार समजले तर नवल वाटता कामा नये. गावोगावी अधिक मास आणि श्रावण महिन्यात रामायण- महाभारत पोथ्यांचे वाचन केल्या जाते.पारायण होतात. त्याबद्दल दुमत नाही,मात्र छत्रपती शिवाजी महाराज यांचेसह सर्वच थोर पुरुषांच्या चरित्र वाचनाचे कार्यक्रम देखील गावोगावी होणे गरजेचे झाले आहे.आमच्या लहानपणी छत्रपती शिवाजी महाराज,डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीला अभ्यासू वक्त्यांची भाषण व्हायची.त्यातून छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य ज्ञात व्हायचे. समाजासाठी सगळ्याच थोरपुरुषांनी केलेल्या कार्याची माहिती व्हायची,त्यातून प्रेरणा मिळायची.मात्र आता डीजे चा कर्णकर्कश आवाज,गोंगाट, झिंगलेली तरुणाई हे सगळं पाहुं जाता आपण कुठल्या दिशेने चाललो आहोत हा प्रश्न समोर उभा ठाकतो.

राजकारणी मंडळी ही तरुणाईचे आदर्श आहेत. घरच्या वडीलधारी मंडळीपेक्षा युवा वर्ग आपल्या नेत्यांचे ऐकतो असे चित्र सर्वत्र दिसते आहे.नेत्यांनी याबाबत तरुणाईला दिशा देणं गरजेचं असतांना प्रत्येकजण आपल्या सोयीचे राजकारण करतो,मात्र या विधायक कामाकडे तरुणाईला वळविण्याचे काम हल्लीच्या राजकारणी मंडळी कडून व्हायला पाहिजे असे अपेक्षित असतांना दुर्दैवाने तसे होतांना दिसत नाही. राज्यातील कुठल्याही नेत्याने वाढदिवसानिमित्त अशा पद्धतीने व्याख्यान ठेवले असे जास्त प्रमाणात बघायला मिळत नाही. आरती सारखे प्रकार युवा वर्गाकडून होत असतील तर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याची खऱ्या अर्थाने त्यांना ओळख होईल किंवा छत्रपतींचे अलौकिक कार्य या पिढी पर्यंत पोहचेल तरी कसे ..? छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव काढले की कुणाचेही रक्त सळसळते,एक वेगळाच जोश व चैतन्य निर्माण होते.ते चैतन्य सतत निर्माण व्हावे असे वाटत असेल तर त्यांना देव बनविण्याचा प्रक्रियेला विरोध करणे गरजेचे आहे,अन्यथा पुढील पिढी ने छत्रपती शिवाजी महाराज हे विष्णूचे दहावे अवतार होते असे म्हटल्यास आश्चर्य वाटता कामा नये.

# आदिवासींचा लढवय्ये क्रांतिकारकांचा इतिहास



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**९ ऑगस्ट हा जागतिक आदिवासी क्रांती दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिन साजरा करत असताना विविध शासकीय कार्यालयात, शाळा महाविद्यालयात आदिवासी क्रांतिकारकांच्या प्रतिमांचे पूजन करून त्यांच्या विचार आणि कार्यावर प्रकाश टाकला जातो.२५०० हजार वर्षाअगोदरचा आदिवासींचा काळ पाहिला तर इथल्या व्यवस्थेने भारत देशातील जे मूळनिवासी आहेत म्हणजेच आदिवासी आहेत त्यांना त्यांच्या हक्कापासून आणि अधिकारापासून कोसो दूर ठेवले होते. त्यावेळी त्यांच्याकडे माणूस म्हणूनही कोणी पाहत नव्हते. नंतर या देशात १८ व्या शतकात इंग्रज आले. इंग्रजांनीही प्रचंड मोठ्या प्रमाणावर आदिवासींचा छळ केला; त्यांच्या जमिनीही बळकावल्या.२४ ऑक्टोंबर १९४५ साली संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना झाली.**

जवळजवळ यामध्ये १९२ देश एकत्र आले. खरे तर या संयुक्त राष्ट्र संघाच्या लक्षात आले की, जंगलात वास्तव्य करून राहणारे जो आदिवासी समुदाय आहे त्या समुदायाने पर्यावरण जपण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य केले आहे. तोच आदिवासी समुदाय मुख्य प्रवाहापासून दूर आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार व इतर अनेक गोष्टीपासून दूर असल्याचे दिसून आले. म्हणूनच आदिवासी जमातीचे अस्तित्व मान्य करण्यासाठी, त्यांची अस्मिता, आत्मसन्मान व एकता अबाधित ठेवण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने ९ ऑगस्ट १९९४ हा दिवस'विश्व आदिवासी दिन'म्हणून घोषित केला.

आदिवासींची पहिल्यांदा इंग्रजांनी १८७१ मध्ये जनगणना केली. या जनगणने'इतर धर्म'( Other Religion ) हा शब्द वापरला. १८८१ साली 'एबबोरिजिनल'( Aborigi- nal ),१८९१ साली 'फॉरेस्ट ट्राईब'( Forest Tribe ),१९०१ साली आणि १९११ घ्या जनगणनेत आदिवासींना'एनिमिस्ट'( Erlimist ),१९४१ च्या जनगणनेत आदिवासींना 'ट्राईब'( Tribe ) हा शब्द वापरण्यात येत असत.१९५० मध्ये भारतीय संविधान लागू करण्यात आले. या भारतीय संविधानात आदिवासींना' शेड्युल ट्राईब' ( Scheduled Tribe ) म्हणून उल्लेख केला आहे. यावेळी आदिवासी शब्दाबद्दल अनेक जणांनी वेगवेगळे शब्द सुचित केले होते. यामध्ये मा.जयपाल सिंह मुंडा,मा. ठक्कर बप्पा व इतरांनी विविध शब्द सांगितले होते परंतु त्यांनी सांगितलेले शब्द कसे अयोग्य आहेत आणि 'अनु.जमाती'हा शब्दच कसा योग्य आहे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले. खरे तर आजही'आदिवासी'शब्दाबद्दल असाच संभ्रम वेगवेगळ्या प्रकारे पसरवून ठेवला आहे. त्यांच्या साहित्य संस्कृती बद्दलही बरेच खोटे नाते लिहून ठेवलेले दिसून येते.

आदिवासी समाजाचा अनेक लेखकांनी इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. पण तो संपूर्णपणे योग्य आहे असे म्हणता येणार नाही. तो इतिहास पूर्वग्रहदूषितपणाने लिहिलेला दिसून येतो आहे. तोच खोटा इतिहास आजही आदिवासी समाजापुढे सांगितला जातो. आदिवासी समाज शूर, वीर, लढवय्या, धाडसी व कर्तुत्ववान आहे. आदिवासी समाजाने स्वातंत्र्य चळवळीत फार मोठे योगदान दिले आहे. इंग्रजांच्या जुलमी सत्तेविरुद्ध, त्यांच्या अन्याय अत्याचाराविरुद्ध अनेक आदिवासींनी जिकरीने प्राणाची बाजू लावून वेळप्रसंगी आहुती देऊन स्वाभिमानाने लढे दिले आहेत. स्वतःच्या अंगावर गोळ्या घेतल्या आहेत. तलवारी अंगावर घेतली आहे परंतु तो मागे हटलेला दिसत नाही. मरण पत्करले पण तो शरण कधी आलेला दिसत नाही. हा सत्य, देदीप्यमान इतिहास मात्र अनेक उच्चवर्णीय इतिहासकाराने लिहिला नाही. तसाच दाबून टाकला म्हणून आजही आदिवासीकडे आम्ही वेगळ्या तिरस्करणीय, चोर, लुटारू, दरोडेखोर




अशा भावनेने पाहतो आहोत. अनेक आदिवासींना आपल्या लढवय्या शूरवीरांचा इतिहास माहित नाही. तो सांगितला ही जात नाही. आदिवासींच्या वतनदाऱ्या नष्ट केल्या, शेतीवर जाचक अटी लादल्या गेल्या, सावकाराकडूनही आदिवासींचे शोषण होऊ लागले, त्यांच्यावर अनेक दावे दाखल होऊ लागले, इंग्रजांकडूनही छळ होऊ लागला म्हणून बिरसा मुंडा, खाजा नाईक, उमाजी नाईक, राघोजी भांगरे अशा अनेक क्रांतिकारकांनी आदिवासींना शोषणातून मुक्त करण्यासाठी, आत्मसन्मान मिळवून देण्यासाठी, गुलामी नाकारण्यासाठी विविध लढे दिले. जीवाचे रान केले.उठाव केले. बंड केले. वेळप्रसंगी जीवाची पर्वाही ही केली नाही.हा जाज्वल्य इतिहास खरे तर लोकांना माहिती व्हावा तो त्यांनी जाणावा, त्यांच्यापासून अन्याय अत्याचाराविरुद्ध, गुलामगिरी विरुद्ध लढण्याची प्रेरणा घ्यावी म्हणूनच हा विश्व आदिवासी गौरव दिन ठिकठिकाणी साजरा केला जातो.

आजही आदिवासींचे वेगवेगळ्या प्रकारच्या माध्यमातून संस्कृतीच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर शोषण केले जाते. न्याय हक्कापासून त्यांना वंचित ठेवले जाते. स्वातंत्र्यानंतरही त्यांना स्वतःच्या विकासा साठी,अस्तित्वासाठी,जल,जंगल, जमिनीसाठी लढा द्यावा लागतो आहे. त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले जात आहे. स्वातंत्र्याचा, विकासाचा उजेड अजूनही त्यांच्या पाड्यापर्यंत पोहोचला नाही. पोहचूही दिला जात नाही. मिडियाही त्यांच्यापर्यंत योग्य पद्धतीने पोहोचत नाही. तरीही शासनाला मात्र त्यांचे काहीच देणे घेणे नाही उलट त्यांच्या मतावर डोळा ठेवून, विकासाचे गाजर दाखवून त्यांच्याकडे ओढले जाते. त्यांच्या या खोट्या अनैतिक वागण्याला बोलण्याला आदिवासी समाजही मोठ्या प्रमाणावर भाळतो,भुलतो व तो आपलं सर्वस्व अर्पण करतो. त्यामुळे तेही गैरफायदा घेऊन त्यांचे शोषण करतात. याविषयी उषा किरण आत्राम आपल्या कवितेत म्हणतात की,

**"तुम्ही असे कसे ?**
**दुसऱ्यांच्या ओंजळीने पाणी पिता ?**
**त्याच ओंजळीने एकलव्याच्या अंगठ्याचे रक्त**
**पितातकुणाच्या मंत्र तंत्र वाणीवर भाळू नका**
**आपणच आपले जगणे मरणे ठरवा."**

म्हणून आदिवासी समाजानेही आता आपल्या बिरसा मुंडा,तंट्या भिल, खाज्या नाईक,उमाजी नाईक अशा क्रांतिकारकांचा इतिहास आपल्या तन मनात रुजवून,कुणाच्या कुठल्याही गोष्टीला न भाळता,भुलता जाणून घ्यायला हवा. तो क्रांतिकारकांचा प्रेरणादायी, स्फूर्तिदायक इतिहास आदिवासी समाजाला सांगून, त्यांच्यांत जागृती घडवून समाजात परिवर्तन घडवून आणायला हवे. सर्वांना जागतिक आदिवासी गौरव दिनानिमित्त शुभेच्छा...!

# चंद्रावर यान उतरवणारा भारत हा जगातील चौथा देश ठरणार ?



आधुनिक केसरी

चांद्रयान - ३ यशस्वीरीत्या चंद्राच्या कक्षेत प्रवेश करुन तेथील पाठवलेला पहिला व्हिडिओ इस्त्रोने शेअर केल्याची बातमी वाचनात आली श्रीहरीकोटा येथे देशभरातून आलेल्या आबालवृद्धांच्या समुदायाने भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या इस्रो शास्त्रज्ञांची आणि स्वदेशी तंत्रज्ञानाची कमाल 'याची देहि याची डोळा' अनुभवली. देशाच्या तिसऱ्या चांद्रमोहिमेचा पहिला टप्पा यशस्वीपणे सर झाला आणि 'चांद्रयान-3' चंद्राच्या दिशेने मार्गस्थ झाले. इस्रोच्या शास्त्रज्ञांसह भारतीयांनी विजयी जल्लोष केला. भारताच्या या मोहिमेकडे संपूर्ण जगाचं लक्ष लागलं आहे. या मोहिमेसाठी भारताने तब्बल 615 कोटी रुपये खर्च केलेत. चांद्रयान-3 अंतराळयान 23 ऑगस्ट रोजी चंद्राच्या पृष्ठभागावर उतरण्याची अपेक्षा आहे. चांद्रयान-3 ने 40 दिवसांचा प्रवास पूर्ण केल्यानंतर विक्रम लँडरच्या साहाय्याने प्रज्ञान रोव्हर चंद्राच्या दक्षिण धुव्रावर उतरेल. दरम्यान ५ ऑगस्ट रोजी चांद्रयान - ३ यशस्वीरीत्या चंद्राच्या कक्षेत प्रवेश केला तेंव्हा त्याने चंद्राचा व्हिडिओ बनवला आहे तो पहिला व्हिडिओ पाठवला आहे ज्यामध्ये अप्रतिम दृश्य दिसून आले आहे चांद्रयान - ३ ने चंद्राच्या कक्षेत केलेला प्रवेश आणि चंद्राभोवती घिरट्या मारताना व्हिडिओमध्ये दिसत आहे १४ जुलै रोजी प्रेक्षपण केले आहे चांद्रयान - ३ चंद्रभोवती प्रचंड वेगाने प्रदक्षिणा घालत आहे २३ ऑगस्ट चंद्राच्या पृष्ठभागावर चांद्रयान ३ चे सॉफ्ट लँडिंग केले जाणारं आहे जर भारताची चांद्रयान- तीन ही मोहीम यशस्वी ठरली तर अमेरिका, रशिया आणि चीननंतर चंद्रावर यान उतरवणारा भारत हा जगातील चौथा देश ठरणारं आहे.त्यामुळे या घटनेकडे देशवासीयांसह जगाचे लक्ष लागून राहिले आहे !

राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव

# आरोग्यविषयक जनजागृती निर्माण होण्याची गरज : सौ. लता मुळे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, दंत महाविद्यालय व रुग्णालय आणि इनरव्हील क्लब, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने श्रेयनगर येथील श्रेयस बालक मंदिर आणि माध्यमिक विद्यालय येथे "भव्य दंत, रोगनिदान तपासणी व उपचार महाशिबीर" आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन श्रेयस शिक्षण प्रसारक मंडळ अध्यक्षा सौ. सुषमा मुळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून इनरव्हील क्लब, छत्रपती संभाजीनगर अध्यक्षा डॉ. इना नाथ, प्रोजेक्ट मॅनेजर सौ. लता मुळे आणि डॉ. श्रीकांत देशमुख होते.

यावेळी सौ. लता मुळे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की विद्यार्थ्यांचे आरोग्य राहणीमान उंचावण्याच्या उद्देशाने प्रत्येक गरिब व गरजू रुग्णांना आरोग्य सुविधा मिळाल्याच पाहिजेत व विशेष म्हणजे गरजू विद्यार्थ्यांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हाव्यात, हा इनरव्हील क्लब, छत्रपती संभाजीनगरचा निर्धार आहे. विद्यार्थ्यांना निरोगी आणि सशक्त जीवन जगता यावे, म्हून अशा प्रकारचे महाआरोग्य शिबीर सात्यताने आयोजित करण्यात येत आहेत. काही विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे औषध उपचार वेळेवर मिळत नाहीत म्हंणून आम्ही दंत, रोगनिदान तपासणी आणि उपचार शिबीर घेत आहोत. बऱ्याच विद्यार्थ्यांना स्वतःला विकार असून देखील तपासणी करण्यासाठी दवाखान्यात जाता येत नाही. अशावेळी समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन सामाजिक चळवळ निर्माण आणि जनजागृती करून त्या रुग्णांची तपासणी करणे गरजेचे असते तरच त्या रुग्णांना पुढील आवश्यक उपचार वेळेवर मिळू शकतात. शिबीरात CSMSS येथील तज्ञ डॉक्टरांमार्फत जवळपास ७५८ विद्यार्थ्यांची मोफत दंत आणि आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच पथनाट्याद्वारे दातांची काळजी, निगा आणि व्यसनामुळे होणारे दुष्परिणाम याबाबत जनजागृती करण्यात आली. शिबिराच्या निमित्ताने इनरव्हील क्लब, छत्रपती संभाजीनगरच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी १० चटई भेट म्हणून देण्यात आल्यात. यावेळी मुख्याधिपिका शैला धुमाळ, श्वेता पवार, इनरव्हील क्लब, औरंगाबाद सचिव विजया नानकर, एडिटर हिरा पेरे पाटील, श्यामल भोगले, वृषाली उपाध्ये, आशा भांड, माधुरी अहिरराव, रेखा केदारे, सुनंदा पाटील, मंगल चव्हाण, किरण पाटील, उषा सूर्यवंशी, शुभांगी वैद्य, डॉ. नरेश निंबाळकर, डॉ. नवीन शाहू, डॉ. कुशल शिंदे, डॉ. शुभेन्द्र खांडेवाले, डॉ. अर्चना चिकटे, डॉ. स्नेहल पवार, डॉ. प्रिया बुलबुले आणि श्रेयस बालक मंदिर आणि माध्यमिक विद्यालयाची शिक्षक, विभागप्रमुख आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# जगजीवन भोईर यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर, पावसाळी क्रिकेट स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे द्रोणागिरी शहर प्रमुख जगजीवन भोईर यांच्या ५२ व्या वाढदिवसानिमित्त रविवार दिनांक ६ ऑगस्ट २०२३रोजी द्रोणागिरी शहरांमध्ये कच्छ युवक संघ यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिर व पावसाळी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमांना शिवसेना जिल्हाप्रमुख मनोहर शेठ भोईर, उरण तालुका प्रमुख संतोष ठाकूर व उरण शहर संपर्कप्रमुख गणेश म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती लावून जगजीवन भोईर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन त्यांचे अभिष्टचिंतन केले. जगजीवन भोईर यांच्या ५२ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात ५२ रक्तदात्यांनी रक्तदान केलं व ५२ व्या वाढदिवस ५२ बाटल्यांची भेट देण्यात आली तसेच पावसाळी रबरी बॉल क्रिकेट स्पर्धेमध्ये बामन डोंगरी क्रिकेट संघाने प्रथम क्रमांक व चिंचपाडा संघाने द्वितीय क्रमांक पटकावला या स्पर्धेमध्ये सुद्धा बारा संघांनी सहभाग घेतला होता.

प्रमुख पाहुणे म्हणून गणेश घरत अंतर्गत युनियन चे कार्याध्यक्ष, सागर घरत सरपंच फुन्डे, कुंदनशेठ भोईर उपसरपंच नवीन शेवा, रायगडभूषण किर्तनकार प्रभाकर महाराज तांडेल नवघर विश्वजित घरत अध्यक्ष फुन्डे, शैलेश भोईर शाखाप्रमुख नवीन शेवा, प्रितम म्हात्रे शाखाप्रमुख फुन्डे, नरेंद्र म्हात्रे माजी शाखाप्रमुख फुन्डे, स्वीय सचिव सुशांत म्हात्रे, सम्राट घरत, समन्वयक नितीन ठाकूर विद्याधर तांडेल माजी उपविभाग प्रमुख सेक्टर ४१ सोसायटीचे पदाधिकारी

वैशाली सुतार महिला संघटिका नवीन शेवा, मयुरी घरत, वैशाली म्हात्रे, शुभांगी भोईर, मिनल म्हात्रे, सविता सुतार, रंजना घरत, जागृती घरत उपस्थित होते.



# अन्विता घरत यांनी राबविला शैक्षणिक उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** जग हे फार सुंदर आहे परंतु पाहण्याचा दृष्टिकोन हवा. आपण जेथे वावरतो जेथे अनुभव घेतो व ज्या चिमुकल्याच्या शालेय सभोवताली त्यांच्यात वावरून तसेच त्यांच्या शिदोरीतुन जे अनुभव घेतलं ज्या शाळेत आपण सेवा दिली. त्या रा. जि. प. शाळा आवरे चे असंख्य असे ऋण आणि ऋणानुबंध आपल्यावर आहेत याची जाणीव ठेवून त्याचीच परतफेड म्हणून शैक्षणिक उपक्रम याचा भाग म्हणून शनिवार दिनांक 5/8/2023 रोजी रा.जि.प शाळा आवरे येथे शिक्षिका अन्विता घरत, अतिश घरत, अनवित घरत यांच्या तर्फे आवरे शाळेतील विद्यार्थ्यांना टाय,पट्टा वाटप करण्यात आला. या सदर प्रसंगी अन्विता घरत, अतिश घरत,अन्वित घरत यांचा सत्कार करण्यात आला. घरत मॅडम यांची बदली झाली तरी त्यांचे आवरे शाळेवरती आणि मुलांवर प्रेम आहे म्हणून त्यांनी मुलांसाठी हे वाटप केले आहे असा हा सुंदर शैक्षणिक उपक्रम राबविण्याताना घरत मॅडम या शेवटी भाऊक झाल्या.



# नुकसानीच्या आकडेवारीची फेरतपासणी करून तत्काळ पंचनामे करा : आ. शिंदे

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** लोहा व कंधार तालुक्यात जुलै महिन्यात अतिवृष्टीचा मोठा पाऊस होऊन खरीप हंगामातील कोवळी पिके खरडून गेल्याने अनेक हेक्टरवरील शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले असल्याने लोहा व कंधार तालुक्यातील शेतकरी बांधवांवर अस्मानी संकट कोसळले होते, पण प्रशासनाच्या वतीने लोहा व कंधार तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीच्या पावसामुळे कोणतेही नुकसान झाले नाही असे भासवत लोहा कंधार तालुक्याचा अतिवृष्टीचा अहवाल शून्य टक्के दाखवला असल्याने हा शासनाला पाठवलेला अहवाल तात्काळ रद्द करून पुन्हा तात्काळ पंचनामे करून शासनाला अहवाल सादर करून मतदारसंघातील शेतकरी बांधवांना आर्थिक मदत देऊन न्याय देण्याची मागणी लोहा कंधार चे लोकप्रिय कर्तव्यदक्ष आमदार शामसुंदर शिंदे यांनी काल सोमवार दि. 7 ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांची भेट घेऊन जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, लोहा तालुक्यातील सोनखेड मंडळात 80 मिलिमीटर पाऊस, कापशी मंडळात 71.75 मिलिमीटर पाऊस, कलंबर मंडळात 67.25 मिलिमीटर पाऊस , माळाकोळी मंडळात 77 मिलिमीटर पाऊस,शेवडी मंडळात 82 मिलिमीटर पाऊस झाल्याने या ठिकाणची अतिवृष्टीची नोंद झाली होती, तर कंधार तालुक्यातील उस्माननगर मंडळात 71.75 मिलिमीटर यासह सर्व लोहा व कंधार सर्व मंडळातील पाऊस झाल्याची नोंद झाली होती या अतिवृष्टीच्या पावसाच्या नोंदी जुलै महिन्यांमधील आहेत, लोहा व कंधार तालुक्यातील या अतिवृष्टीच्या नुकसानी बाबत फेरतपासणी करून तात्काळ पंचनामे करून मतदारसंघातील शेतकरी बांधवांना तात्काळ आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांना निवेदन देऊन सखोल चर्चा केली व मतदारसंघातील शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदतीसह न्याय देण्याची मागणी केली, यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रसेन पाटील, शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हाध्यक्ष बालाजी ईसादकर, डोणवाडाचे उपसरपंच हनुमंत पाटील जाधव, अशोक बोधगिरे सह पदाधिकारी उपस्थित होते.

# वंचित बहुजन आघाडीतर्फे तालुक्यातील अतिक्रमणधारकांचे फॉर्म तहसीलमध्ये दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** दि.७ ऑगस्ट रोजी तहसील कार्यालय खुलताबाद या ठिकाणी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रद्धेय प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर व प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकूर यांच्या आदेशावरून, औरंगाबाद जिल्हा प्रभारी अरुंधतीताई शिरसाट व जिल्हा अध्यक्ष योगेश बन यांच्या सुचनेनुसार खुलताबाद तालुका अध्यक्ष मुक्तार भाई सय्यद यांच्या नेतृत्वात खुलताबाद तालुक्यातील सुलीभंजन, नांद्राबाद, खांडी पिंपळगाव, निरगुडी, सराई, सहजतपूर या गावातील अतिक्रमण धारकांना भेटून सविस्तर चर्चा व माहिती घेऊन आज तहसील कार्यालय खुलताबाद येथे अतिक्रम धारकाचे एकीची नोंद पंचनामे व आधार कार्ड सर्व कागदपत्रे जोडून फॉर्म भरून घेण्यात आले. व ज्यांच्याकडे काहीच पुरावे नसून त्यांनी घरासाठी अतिक्रमण केलेले आहे व त्यांचे घर सुद्धा बनलेले आहे असे अतिक्रमण धारकाचे आधार कार्ड व मतदान कार्ड जोडून तहसील कार्यालयात सबमिट करण्यात आले हे अतिक्रमण १९८२साली पासून तर कोणी १९९० साली पासून जमिनी कसत आहे व घर बांधकाम करून राहत आहे. तरी तहसीलदार स्वरूप कंकाळ साहेबांनी हे पुढील कार्यालयास दाखल करून सर्व अतिक्रमण धारकांना सातबारा व नमुना नंबर आठ जागेचा बनवून द्यावा. अशी विनवणी वंचित बहुजन आघाडी खुलताबाद तर्फे तहसील कार्यालय व राज्य सरकारने तात्काळ पाऊल उचलून अतिक्रम धारकाचे रहात असलेले घर व कसत असलेली जमीन या वंचितांना न्याय देण्यात यावे अशी आमची मागणी असुन खुलताबाद तालुक्यातील अतिक्रमण गायरान धारक यांना आवाहन करण्यात येते की, तालुकाध्यक्ष मुक्तार भाई सय्यद, महासचिव राजाराम घुसाळे, यांना संपर्क साधुन आपले कागदपत्र सादर करावे ही विनंती. यावेळी अरुण गायकवाड, शाखा अध्यक्ष बाळू भालेराव, अनिल जाधव, संतोष भालेराव, व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते व गायरान धारक महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.



हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# कृषी विभागामार्फत पौष्टिक तृणधान्य वर्ष अंतर्गत विद्यार्थी पोषण पंधरवडा साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील तिडका येथे तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया, मंडळ कृषी अधिकारी संपत वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष अंतर्गत तालुक्यात गावागावात 1 ऑगस्ट ते 14 ऑगस्ट पर्यंत विद्यार्थी पौष्टिक आहार व राजगिरा पीक जागरूकता मोहीम राबवण्यात येत आहे त्याचेच औचित्य साधून तिडका येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना पौष्टिक तृणधान्याचे आहारातील महत्त्व व तृणधान्य ही काळाची गरज ओळखून तृणधान्य पिकांचा पेरा वाढवण्यासंदर्भात कृषी पर्यवेक्षक प्रदीप पाटील यांनी सविस्तर असे मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना तृणधान्याचा आहारात वापर व जनजागृतीसाठी शपथ दिली. तसेच श्रावण महिन्यात राजगिरा पिकाचे महत्त्व व उत्पादित झालेल्या राजगिरा पिकाचे सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगातून होणारा फायदा याविषयी कृषी सहाय्यक सतीश बोरसे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना राजगिरा लाडू चे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास सरपंच गुलजार तडवी, ग्रामपंचायत सदस्य तसेच शाळेचे मुख्याध्यापक मोरे सर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगरपालिका क्षेत्रात स्वच्छता अभियानाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** शहरांमध्ये फक्त सुशोभिकरणच नव्हे तर सातत्याने स्वच्छताही आवश्यक आहे. प्रशासनाने शहरांच्या स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी दिले आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील विविध नगरपालिका क्षेत्रात दि. ४ ऑगस्ट २०२३ रोजी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. मागील महिन्या प्रमाणे उरण शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

सदर अभियानात उरण शहरातील सर्वोदय वाडी, नगर परिषद कार्यालय परिसर, विमला तलाव, तहसील कार्यालय परिसर, तुंगेकर बालोद्यान या ठिकाणी सफाई करण्यात आली. सदर अभियानात एकूण ३ टन कचरा उचलण्यात आला. या अभियानात उपजिल्हाधिकारी जनार्दन कासारे, तहसीलदार उद्धव कदम ,वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम तसेच उरण नगर परिषदेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे, लेखापाल सुरेश पोसतांडेल, नगररचनाकार सचिन भानुसे , बांधकाम अभियंता झुंबर माने, माजी नगराध्यक्षा सायली म्हात्रे , माजी नगर सेवक कौशिक शहा, प्रसाद मांडेलकर यांचे श्रमदानातून पार पडले. तसेच उरण नगर परिषद शाळा क्र १,२,३ चे शिक्षक तसेच विद्यार्थी, माय नॉलेज चे विद्यार्थी यांनी सदर अभियानात भाग घेऊन श्रमदान केले . सदर स्वच्छता अभियाना मुले उरण शहर स्वच्छ होण्यास नक्की मदत होणार आहे.त्यामुळे जास्तीत जास्त विविध सामाजिक संस्था, संघटना, पर्यावरण प्रेमी, नागरिकांनी या अभियानात सहभागी व्हावे असे आवाहन उरण नगर परिषदेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी केले आहे.





# यादव तायडे यांना आदर्श माळी समाज भूषण पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथील आदर्श माळी युवक मंडळातर्फे नागापूर येथील माजी स्वातंत्र्य सैनिक यादवराव तायडे यांना सन २०२३ च्या आदर्श माळी समाज भूषण पुरस्काराने रविवारी संभाजीनगर येथे गौरवण्यात आले. तसेच माळी समाजातून नीटची परीक्षा उत्तीर्ण झालेले, दहावी, बारावी, प्रथम द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचाही गुणगौरव करण्यात आला. यावेळी गृहनिर्माण मंत्री व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, जिरेमाळी सेवा संघ मुंबईचे संस्थापक व सचिव नारायण डी. नवले, विजय काठोळे, डॉ. राजेंद्र धनवई, कन्नडच्या नगराध्यक्षा स्वातीताई कोल्हे, माजी नगराध्यक्ष संतोष कोल्हे, पिशोरचे पी. एम. डहाके, डॉ. विजयकुमार फड, ॲडिशनल सीइओ सुनील भोकरे, चंद्रकांत बागुल, साळूबा डहाके, विस्तार अधिकारी नारायण डोंगरे, जगन्नाथ माळी, प्रा. संतोष कारले उंडणगावकर, फुलंब्री राज्य उत्पादक शुल्क विभागाचे निरीक्षक श्री नारायणराव डहाके यांच्याकडे फुलंब्री तालुक्यासह चार तालुके कन्नड सिल्लोड सोयगाव खुलताबाद या विभागाची पूर्ण कारभार असल्यामुळे त्यांचे काम एकदम उत्कृष्ट आहे त्यांच्यामुळे पाचही तालुक्यात अवैद्य देशी दारू व हातभट्टी वाल्यांनी तसेच हॉटेल चालकांना चांगलीच धास्ती घेतली आहे त्यांच्याकडे कमी कर्मचारी असून सुद्धा ते रात्रंदिवस मेहनत करतात त्यांचे पाच तालुक्यामध्ये कौतुक केले जात आहे.

# महसूल कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** सध्या संपूर्ण राज्यात राजस्व अभियान चालू आहे,याचाच भाग म्हणून रविवार रोजी येथील उपजिल्हा रुग्णालयात तहसील मध्ये कार्यरत सर्व अधिकारी,कर्मचारी वर्गाची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय औरंगाबाद यांच्या वतीने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. आरंभी वैद्यकीय अधीक्षक डॉ. गजानन टारपे, तहसीलदार सुनील सावंत व जिल्हा आरोग्य समिती सदस्य धोंडीरामसिंह राजपूत यांच्या हस्ते फीत सोडून या आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे उदघाटन करण्यात आले. या शिबिरात महसूल ५१ महसूल कर्मचारी यांची आरोग्य तपासणी करण्यात आली तर १९रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्त संकलन जिल्हा सामान्य रुग्णालयचे रक्त संकलन अधिकारी डॉ. महेश केसाळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. तहसीलदार सुनील सावंत, उप जिल्हा रुग्णालयचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. टारपे व डी.डी. राजपूत यांनी आरोग्य तपासणी चे महत्व विशद केले. रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. आशिष पाटणी, डॉ,दीपमाला परदेशी, शशिकांत पाटील, श्याम उचित, मुख्य परिचारिका श्रीमती कुलकर्णी, श्रीमती रुख्मिनी गवई, श्री चौधरी यांनी पुढाकार घेतला, महसूलचे नायब तहसिलदार किरण नारकड, किरण कुलकर्णी, दिलीप त्रिभुवन, जितेंद्र चापानेरकर यांनी सहकार्य केले.






# स्थलांतरित केलेली अंगणवाडी मिलिंद बुद्ध विहारातच सुरू करा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मागील वीस वर्षांपासून पठाणपुरा वार्डातील मिलिंद बुद्ध विहारात अंगणवाडी सुरू आहे. काही दिवसांपूर्वी पर्यवेक्षिकेच्या हेतुपुरस्सर दबावातून ही आंगणवाडी दुसरीकडे स्थलांतरित करण्यात आली. त्यामुळे परिसरातील बालकांना, स्तनदा मातांची गैरसोय दूर करण्यासाठी मिलिंद बुद्ध विहारातच ही आंगणवाडी पूर्ववत सुरू करण्याची मागणी स्थानिक महिलांनी चंद्रपूर श्रमिक पत्रकार भवनात आयोजित पत्रकार परिषदेत सोमवारी केली. मिलिंद बुद्ध विहारात मागील वीस वर्षांपासून नियमित आंगणवाडी भरत असताना एकात्मिक विकास सेवा योजनेअंतर्गत असलेल्या पर्यवेक्षिका मीना गिरडकर यांनी अंगणवाडीत पोषण आहार कार्यक्रमात आलेल्या महिलांना जय भीम म्हणायचे नाही, अशा सूचना केल्या. यामुळे काही महिलांनी मीना वैरागडे यांना विरोध केला. या रागातून वैरागडे यांनी आंगणवाडीच बुद्ध विहारातून दुसरकडे स्थलांतरित करण्याची सूचना आंगणवाडीसेविकांना केली. त्यामुळे आंगणवाडी दुसरीकडे स्थलांतरित करण्यात आली. परंतु, बुद्ध विहार परिसरातील लहान मुले आणि स्तनदा मातांची गैरसोय झाली आहे. त्यामुळे आंगणवाडी पूर्वीच्या ठिकाणीच सुरू करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. पत्रकार परिषदेला परिसरातील महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती हेती.



# मुलच्या उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन

## 50 खाटांच्या रुग्णालयाला आता विशेष बाब म्हणून 100 खाटांची मान्यता

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्ह्यात आरोग्याच्या अत्याधुनिक



सोयीसुविधा निर्माण व्हाव्यात, नागरिकांना वेळेवर आरोग्य सुविधा मिळावी, यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार नेहमीच प्रयत्नशील असतात. त्याचीच फलश्रुती म्हणून मुल येथील उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्यात आले असून 50 खाटांचे उपजिल्हा रुग्णालय आता विशेष बाब म्हणून 100 खाटांचे करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

मुलमध्ये 50 खाटांचे उपजिल्हा रुग्णालय आहे. या रुग्णालयात दिवसेंदिवस रुग्णांची संख्या वाढत असल्याने नागरिकांनी 100 खाटांचे अत्याधुनिक रुग्णालय करण्याची मागणी जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे केली होती. मुनगंटीवार यांनी मुलच्या व आसपासच्या नागरिकांना उत्तम सुविधा मिळाव्या यासाठी सातत्याने पाठपूरावा केला होता.आता या पाठपुराव्याला यश आले असून मुल उपजिल्हा रुग्णालय विशेष बाब म्हणून 100 खाटांचे करण्यासाठी शासनाने 3 ऑगस्ट 2023 रोजी मान्यता दिली आहे.

उपजिल्हा रुग्णालयात या सुविधा होणार उपलब्धः सद्यस्थितीत मूल येथील उपजिल्हा रुग्णालय 50 खाटांचे आहे. श्रेणीवर्धनामुळे अतिरिक्त 50 बेड निर्माण होतील. त्यामुळे 100 खाटा करिता लागणारी नवीन पदनिर्मिती होईल. यात चतुर्थ श्रेणी कर्मचारी, परिचारिका, तांत्रीक पदे यांच्यासोबतच विशेषतज्ञांची सुद्धा पदे निर्माण होतील. श्रेणीवर्धनामुळे नेत्रतज्ञ, अस्थिरोगतज्ञ, भूलतज्ञ यासारख्या सात वैद्यकीय अधिकाऱ्यांची नवीन पदे निर्माण होतील. तसेच शंभर खाटांची नवीन इमारत तयार झाल्यानंतर या ठिकाणी नवीन विशेषउपचार कक्ष स्थापित करण्यात येतील व सर्व प्रकारच्या विशेषज्ञ सेवा पुरविता येणे शक्य होणार आहे.

या ठिकाणी डोळ्यांच्या व अस्थिरोग शस्त्रक्रियासाठी नवीन शस्त्रक्रियागृह निर्माण होईल. नव्याने कार्यान्वित होणाऱ्या विशेषउपचार कक्षाकरिता आधुनिक वैद्यकीय उपकरणे व यंत्रसामुग्री उपलब्ध होतील. तसेच आरोग्य सेवा व सुविधांमध्ये वाढ होईल. या ठिकाणी डिजिटल सोनोग्राफी तसेच एक्स-रे आणि सर्व प्रकारच्या प्रयोगशाळा चाचण्या होतील.

100 खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये वैद्यकीय अधीक्षक तसेच बालरोगतज्ञ, स्त्रीरोगतज्ञ, अस्थिरोग तज्ञ, नेत्रतज्ञ, सर्जन, भूलतज्ञ आणि इतर वैद्यकीय अधिकारी अशी मिळून 14 वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे निर्माण होतील. त्यामुळे सर्व आरोग्य सुविधा मिळणार असल्याने नागरिकांना जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्याची गरज पडणार नाही.

# पोलिसांचे लक्ष वेधण्यासाठी बलात्कार पीडितेने घेतले विष

## पोलीस निरीक्षकावर कारवाई करा

आधुनिक केसरी न्यूज

**श्याम हेडाऊ**

**चंद्रपूर :** एका बलात्कार पीडित महिलेने पोलीस स्टेशनमध्ये विष घेतल्याची धक्कादायक घटना चंद्रपूर जिल्हात उघडकीस आली आहे. या घटनेने पोलीस विभाग आणि जिल्हा प्रशासन हादरले आहे.सहायक पोलीस निरीक्षक निलेश चौरे यांच्यावर कार्यवाही करावी ही मागणी घेत पीडितेने विष घेतल्याचे चौकशीत समोर आले आहे.

प्राप्त माहितीनुसार, जिल्ह्यातील वरोरा पोलिस स्टेशन अंतर्गत पीडित महिलेचे गाव येते.पीडित महिला अंदाजे 36 वर्षांची आहे. तिने ऑक्टोबर 2022 मध्ये आरोपी इरफान शेख विरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल केला होता. आरोपीवर 376 आणि एट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली होती. मात्र या प्रकरणात आरोपीला जामीन मिळाल्यावर आरोपी आणि त्याचे नातलग त्रास देत असल्याचा पीडित महिलेचा आरोप होता.सोबतच आरोपींना वरोरा पोलीस स्टेशनचे API निलेश चौरे मदत करत असल्याचा देखील महिलेने आरोप केला आहे.आरोपींना मदत करणाऱ्या सहायक पोलीस निरीक्षक ( API ) निलेश चौरे यांच्यावर कारवाई करण्याची महिलेने शनिवारी वरोरा येथे प्रेस कॉन्फरन्स घेत मागणी केली होती.मात्र API चौरे यांच्यावर कारवाई न झाल्याने महिलेने वरोरा पोलीस स्टेशन मध्ये विष प्राशन केले. महिलेला वरोरा उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने चंद्रपूर जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी पाठवण्यात आलं आहे. या धक्कादायक घटनेने जिल्हा हादरला आहे. पोलीस विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्न उपस्थित केले जात आहे. पुढील तपास वरोरा पोलीस करीत आहेत.

# गृहरक्षक दल लोहा-कंधार समादेशकपदी गुंडेराव खेडकर

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** महाराष्ट्र पोलीस दल अंतर्गत सुरक्षेचा महत्त्वाचा भाग समजला जाणारा गृहरक्षक दल असून या माध्यमातून सुरक्षेची महत्त्वाची जबाबदारी बहुतांशी प्रमाणात गृहरक्षक जवान पार पडतो. याच दलाच्या लोहा कंधार तालुका समदेशक पदी गुंडेराव खेडकर यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली.

गुह्रक्षक दलात मागील ३५ वर्षांपासून सेवा बजावत असलेले गुंडेराव गोविंद खेडकर यांनी तब्बल १४ वर्ष पलटण नायक म्हणून अत्यंत उत्कृष्ठरित्या व प्रामाणिकपणे कर्तव्य बजावले. त्यांची नुकतीच लोहा कंधार तालुका समादेशक अधिकारी पदी निवड करण्यात आली. त्यांना भापोसे जिल्हा समादेशक तथा अप्पर पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या स्वाक्षरीने प्रभारी अधिकारी परिहार व शेटे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले.

खेडकर यांनी दक्षिण भारतातील प्रसिद्ध श्रीक्षेत्र खंडेरायाच्या माळेगाव यात्रेत गत २० वर्षापासून गृहरक्षक जवानाच्या माध्यमातून बंदोबस्ताचे योग्य व चोख नियोजन केले. त्यांनी गृहरक्षक दलात आजपर्यंत केलेले काम व सेवाकाळ लक्षात घेवून त्यांना कंधार व लोहा तालुका समादेशक अधिकारी म्हणून निवडण्यात आले. खेडकर यांना श्री स्टार मिळाले असून नुकतेच घाटकोपर मुंबई येथील गृहरक्षक दल मुख्यालयी छडी, कवायत तसेच तलवार चालवणे, पिस्तूल चा वापर करणे आदी प्रकारचे पंधरा दिवसाचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे.

त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून खेडकर यांचे कौतुक होत आहे. कंधार येथे गृहरक्षक दल मित्र परिवाराकडून भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी पलटण नायक भीमराव जोंधळे, राजकुमार कदम, कवायत प्रशिक्षक शिवाजी गवळे, प्रेरक संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा गृहरक्षक जवान पांडुरंग सोनकांबळे, चक्रधर घुगे, सलीम शेख, रघुनाथ करेवाड, दिपक लोखंडे, शंकर बामणवाड, महेबुब शेख, नारायण केंद्रे, नामदेव घुमे, भानुदास केंद्रे, सुरेश गीते, शेख गुलाम, स्वामी, गजानन मानेवार, तळनिकर, माया कदम, सुमन फुले, द्रोपदा पवार, अनिता येंगडे, राधा नीलेवाड, पदमिन गायकवाड सह बहुसंख्येची उपस्थिती होती.

# सोळशी येथे रंगणार कविसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** साहित्यप्रेमी सेवाभावी फाऊंडेशन फलटणचे अध्यक्ष व माणदेशी साहित्यिक,ज्येष्ठ कवी ताराचंद्र आवळे यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे कवी संमेलन शनैश्वर देवस्थान सोळशी, ता.कोरेगांव येथे आयोजित करण्यात आलेले आहे. अधिक श्रावण व निज श्रावण मास शनैश्वर आनंद सोहळा २०२३ निमित्त परम पूज्य शिवयोगी नंदगिरी महाराज यांनी श्रावण मासामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.शनिवार दिनांक १२ ऑगस्ट रोजी निमंत्रितांचे कवी संमेलन घेण्यात येत आहे. कवी संमेलनाचे सूत्रसंचालन रानकवी राहुल निकम करणार असून निमंत्रित कवी म्हणून विलास वरे, आनंदा ननावरे, गंगाराम कुचेकर, विलास पिसाळ, प्रकाश सकुंडे,जयकुमार खरात, शाहीर शोभाकांत किन्हईकर, प्रा.जगन्नाथ विभुते, प्रा.दशरथ जाधव, प्रा.अशोक माने, प्रा.नंदकुमार शेडगे, जनार्दन गार्डे, लक्ष्मण शिंदे, अजित क्षीरसागर, अजित जाधव, अंशुमन जगदाळे आदी उपस्थित राहणार आहेत. निसर्ग, पर्यावरण, श्रावणधारा, वैश्विक तापमान वाढ आणि पाऊस अशा विविधांगी, बहारदार, समाजप्रबोधन करणाऱ्या कविता ऐकायला मिळणार आहेत.जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून या कवी संमेलनाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन संयोजक समितीच्या वतीने राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ साहित्यिक जगन्नाथ शिंदे यांनी केले आहे.

# ज्ञानकुंज महाविद्यालयामध्ये रानकवी ना. धों. महानोरांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी ज्ञानकुंज कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व ज्ञानकूंज इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल बाजार सावंगी येथे रान कवी पद्मश्री पुरस्कार प्राप्त माजी विधान परिषद आमदार ना. धो. महानोर रानकवी यांना ज्ञानकुंज महाविद्यालयामध्ये भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली यायाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश झुंजुर्के प्रा. मनोज राणे,श्रीमती योगिता पारनेरे नितीन पवार, राम राठोड श्रीमती वृषाली कुलकर्णी, कृष्णा चव्हाण,अविनाश गाडेकर,योगेश सुरडकर,श्रीमती सुरेखा जाधव, दीपक पाटील,राहुल गायकवाड,श्री भूषण जाधव,अविनाश कोलते, अक्षय जाधव,श्रीमती नलावडे,पाचवने मॅडम, खान मॅडम ,चोपडे मॅडम, आजिनाथ जाधव ,धुमाल बाबा, यांची उपस्थिती होती.





# एडिटर अँड प्रेस रिपोर्टर असोसिएशनच्या वतीने पत्रकार देहाडेंच्या कुटुंबास मदत

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जुलै महिण्यात पत्रकार कल्याण देहाडे यांचे हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले होते. त्यांची घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. घरातला कर्ता पुरुष, कुटुंबप्रमुखाचे निधन झाल्यामुळे संपूर्ण कुटुंब कोलमडून पडले आहे. त्यांच्या कुटुंबाला आर्थिक आधार मिळावा म्हणून मदत करण्याचे आवाहन संघटनेचे अध्यक्ष रतनकुमार साळवे, रशपाल अट्टल यांनी केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत अनेक सुज्ञ पत्रकार बांधवानी समोर येऊन उस्फुर्तपणे यथाशक्ती मदत केली.

आज त्यांच्या पत्नीची भेट घेऊन त्यांचे सात्वन केले. एकूण जमा झालेली मदत १७५००/-कल्याण देहाडेच्या पत्नीला सुपूर्द करण्यात आले . यावेळी संघटनेचे अध्यक्ष, रतनकुमार साळवे, कार्यध्यक्ष, रशपालशिंग अट्टल, जितेंद्र भवरे, भाऊसाहेब शेजूळ, कल्याण देहाडे यांचे बंधू, पत्नी, मुलगा, सून, नातवंड आदी उपस्थित होते.




# नीलिमा चव्हाण मृत्यूची सखोल चौकशी करा

## खंडाळा येथे रिपब्लिकन पक्षाच्या वतीने निवेदन

आधुनिक केसरी न्यूज



**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** नीलिमा चव्हाण मृत्यूची सखोल चौकशी करून कडक कारवाई करण्याबाबतचे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) खंडाळा तालुका यांच्या वतीने खंडाळा तहसीलदार अजित पाटील यांना देण्यात आले.यावेळी खंडाळा तालुका अध्यक्ष पवन धायगुडे पाटील, केंद्रीय पत्रकार संघाचे अनिल केदारी, सतिश मोटे,सुदाम तात्या कांबळे, दत्तात्रय धायगुडे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

दिलेल्या निवेदनात असे म्हटलेले आहे की, राजगड दापोली येथे स्टेट बँकेमध्ये कंत्राटी कर्मचारी असणाऱ्या २४ वर्षीय नाभिक समाजाची नीलिमा चव्हाण हिचा दाभोळ समुद्रकिनारी मृतदेह सापडलेला आहे. तो संशयितरित्या असल्याचे निदर्शनात येत आहे. या घटनेचा रिपब्लिकन पक्षाच्या जिल्हा कार्यकारणीच्या वतीने तसेच महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ यांच्या नेतृत्वाखाली तीव्र शब्दात निषेध करत आहोत व नाभिक समाजाच्या आमच्या भगिनी नीलिमा चव्हाण च्या मृत्यूची सकोल चौकशी करण्यात यावी याची मागणी केली आहे.

पुढे असे म्हटले आहे की,नीलिमा सुधाकर चव्हाण ही मुलगी दापोली येथून आपल्या गावी दिनांक 28 जुलै रोजी निघाली होती ती त्याकरता खेड येथील एसटी स्टँड मधून एसटीमध्ये बसली. परंतु गावी घरी पोहचली नाही.दाभोळ येथील समुद्रकिनारी तिचा मृतदेह विचित्र अवस्थेमध्ये सापडला. डोळ्याचे केस काढलेले तसेच भुवया काढलेल्या अशा भयानक अवस्थेमध्ये त्यामुळे संबंधित मुलीचा घातपात झाल्याची शक्यता नाकरता येत नाही.

त्यामुळे पोलिसांनी योग्य तो तपास करावा व ज्या कोणी हे कृत्य केलेले आहे. अशा लोकांवरती कडक कारवाई करण्यात यावी. या मागणीसाठी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने येणाऱ्या काळात तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल. एकंदरच नीलीमा चव्हाण ही नाभिक समाजाची मुलगी असल्याने तेथील नाभिक समाजावरती दुःखाचा डोंगर कोसळला आहे ज्यांनी हे कृत्य केले आहे त्यांचा व त्या घटनेचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करतो. असे निवेदनातून म्हटलेले आहे.अशा नराधमांना त्वरित अटक करून फासावर लटकवण्यात यावे.या मागणीसाठी निवेदन देण्यात आलेले आहे.

# अंगणवाडी भरतीमध्ये दिव्यांग महिलांना डावलले

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका भरती मध्ये दिव्यांग मुली आणि महिलांना डाउनलोड ही भरती प्रक्रिया राबविली जात आहे. सध्या महाराष्ट्रात अंगणवाडी सेविका मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविकांची हजारो पदे शैक्षणिक पात्रता व आरक्षण निहाय भरली जात आहेत. पैठण तालुक्यात देखील सध्या ६२ जागेसाठी ही भरती प्रक्रिया सुरू आहे. पैठण सह महाराष्ट्रात सुरू असलेल्या अंगणवाडी भरती प्रक्रिया मध्ये दिव्यांग मुली आणि महिलांना कुठेही प्राधान्य देण्यात आले नसून दिव्यांग प्रवर्गात मोठी नाराजी पसरली आहे.

सदरील भरती प्रक्रियेत दिव्यांग मुली व महिलांना राखीव जागा ठेवण्यात याव्यात अशी मागणी प्रहार अपंग संघटनेचे राज्य सदस्य तथा जिल्हाध्यक्ष शिवाजी गाडे यांनी एका लेखी निवेदनाद्वारे दिव्यांग कल्याण मंत्रालय प्रमुख आमदार बच्चू कडू यांची भेट घेऊन केली आहे. विशेष म्हणजे या भरती प्रक्रियेत सर्व प्रकारचे आरक्षण लागू केले असून फक्त दिव्यांगानाच गुण प्रदान प्रक्रियेतून वंचित ठेवले आहे. बुधवार दिनांक २ ऑगस्ट रोजी दिव्यांग कल्याण मंत्रालयात झालेल्या बैठकीत माजी राज्यमंत्री बच्चू कडू व दिव्यांग कल्याण आयुक्त कार्यालयाकडे या प्रक्रिये बाबत शिवाजी गाडे यांनी निवेदन देत आक्षेप घेतला आहे. सन १९९५ चा अपंग पुनर्वसन कायदा व सन २०१६ चा दिव्यांग हक्क अधिनियम कायद्याची अंमलबजावणी करून दिव्यांग मुली आणि महिलांना अंगणवाडी भरती प्रक्रियेत सामावून घ्यावे अन्यथा सध्या सुरू असलेली भरती प्रक्रिया त्वरित थांबवावी अशी मागणी महिला व बाल विकास मंत्री श्रीमती आदिती तटकरे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.राज्य व केंद्र शासनाच्या सर्वच शासकीय निम शासकीय भरती प्रक्रियेत दिव्यांगांना प्राधान्य देण्यात येते. त्यानुसार अंगणवाडी सेविका मदतनीस भरती प्रक्रियेत दिव्यांगांना डावलण्यात येऊ नये अशी मागणी प्रहार संघटनेच्या वतीने छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष शिवाजी गाडे यांनी केली आहे.

यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे विजय काणेकर, प्रहार महाराष्ट्र संपर्कप्रमुख रामदास खोत, संतोष मुंडे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष धर्मेंद्र सातव, संभाजी लांडे गुरुजी यांची उपस्थिती होती.

# बससाठी शाळकरी मुलांनी केला रस्ता रोको

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** दुर्गम जंगली भागात शाळा नसल्याने या भागातील मुलांची ओढाताण होते. ते बसने प्रवास करीत शिक्षण घेतात, पण बस वेळेवर आली नाही तर चांगलीच आफत होते. हे अनुभव आष्टी तालुक्यातील मोई तांडा, मुबारकपुर, आबाद किन्ही या जंगलव्याप्त गावातील विद्यार्थी घेत आहेत. बस वेळेवर न आल्याने ते उशिरा शाळेत पोहचतात. त्यावेळी काही तासिका संपून जातात. शिक्षक खेकसतात. बोलणी ऐकावी लागतात. सरपंच सुषमा चव्हाण यांनी पत्र व्यवहार करूनही दाद मिळाली नाहीच. त्यास कंटाळून शंभरावर मुलामुलींनी शेवटी मार्गावर ठिय्या दिला. हा रस्ता रोको खळबळ निर्माण करणारा ठरला. ठाणेदार सुनील पवार यांनी तडक आंदोलन स्थळी भेट दिली. मुलांची समजूत काढली. त्यांना आश्वस्त केले. तेव्हाच मार्ग मोकळा झाला. शिकण्याची तळमळ पण शासन काही आपल्या दारी येत नाही म्हणून विद्यार्थी व त्यांच्या आईवडिलांचा हा प्रयत्न चांगलाच चर्चेत आहे.



# वडोद बाजार येथे नेत्र तपासणी शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** वडोद बाजार ग्रुप ग्रामपंचायत व लायन्स क्लब नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने वडोद बाजार येथे सोमवारी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिराचे उद्‌घाटन सोमवारी सकाळी उपसरपंच गोपाळ वाघ यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी कॉम्प्युटर मशीन द्वारे डोळ्याची तपासणी करून रुग्णांना डोळ्याच्या तपासणी नंतर नंबर व चष्मे सवलतीच्या दरात देण्यात आले व पिवळे कार्ड रेशन कार्ड धारक यांना मोफत उपचार करण्यात येईल करून देण्यात येणार असल्याचे यावेळी रुग्णांना माहिती देण्यात आली या शिबिरात अनेक रुग्णांनी डोळ्याची तपासणी करून घेतली यावेळी वडोद बाजार येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी नासेर पठाण अशोक शिंगारे, अरुण वायकोस, जनार्दन शिंगारे, किशोर पाटील, रामदास कापसे, गोलू सैयद नितीन कोलते दत्तू राकडे, रघुनाथ काटकर सुभाष कोलते शेख रईस, बाळू शेंडे आदींसह नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठी गझल मुशायऱ्याचे भव्य आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**खामगाव :** १६ ऑगस्ट रोज सायंकाळी ५ वाजता कोल्हटकर स्मारक मंदिर,खामगाव येथे आजादी का अमृत महोत्सव निमित्ताने वृक्षारोपण व आदर्श शिक्षिका, उपक्रमशील केंद्रप्रमुख, कर्तव्यदक्ष शिक्षण विस्तार अधिकारी, साहित्यिक तथा सामाजिक कार्यकर्त्या वनश्री ऊर्मिला श्रीकृष्णराव ठाकरे यांच्या सेवानिवृत्तीच्या निमित्ताने वळून बघतांना या पुस्तकाचे प्रकाशन आणि सुरेश भट गझल मंच, पुणे प्रस्तुत गझल रंग दर्जेदार मराठी गझल मुशायरा चे भव्य आयोजन मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे.कार्यक्रमाचे उद्‌घाटन मा.श्रीमती भाग्यश्रीताई विसपुते भा.प्र.से, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा ह्यांच्या शुभहस्ते होणार असून अध्यक्षस्थानी गोविंद नांदेडे शिक्षण संचालक , पुणे हे उपस्थित राहणार आहेत.

मराठी गझल मुशायरा चे सूत्रसंचालन शाहीर सुरेशकुमार वैराळकर करणार असून किशोर बळी, अमोल शिरसाट,विजयालक्ष्मी वानखेडे, नितीन देशमुख,गोपाल मापारी, वनश्री ऊर्मिला ठाकरे, योगिता पाटील,शशिकांत कोळी,ज्ञानेश पाटील हे गझलकार "गझलरंग" दर्जेदार मराठी गझल मुशायरा मध्ये गझल सादरीकरण करणार आहेत. या कार्यक्रमास रसिकमित्रांनी इष्ट मित्रांसह उपस्थित राहावे,असे आवाहन आयोजक संजीवनी मल्टिपर्पज एज्युकेशन वुमेन्स अकॅडमी, केंद्रप्रमुख,शिक्षक संघटना,कर्मचारी संघटना, साहित्यिक मित्र मंडळ व पर्यावरण मित्र मंडळ खामगाव यांनी केले आहे.



# अन्नदिनानिमित्त रेशन दुकान नं. ४४ येथे शिधापत्रिकाधारकांना मोफत धान्यवाटप

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शासनातर्फे अन्नदिनानिमित्त सोमवार दि. ७ जुलै रोजी मोफत धान्यवाटप करण्यात आले. शहरातील साक्री रोडवरील स्वामी पद्मनाभ नगर येथे रेशन दुकान क्रमांक ४४ मध्ये हा मोफत धान्यवाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी नगरसेवक सुनील बैसाणे, बन्सी जाधव, माजी नगरसेविका कशीश उधासी, वंदना बागुल, रेशन दुकानदार चालक मालक संघर्ष व समन्वय समितीचे उपाध्यक्ष राजेश ओहाळ, अमर ओहाळ या मान्यवरांच्या हस्ते लाभार्थी शिधापत्रिकाधारकांना मोफत धान्य वाटप करण्यात आले, यात प्रति लाभार्थी २ किलो गहू ३ किलो तांदूळ व १ किलो साखर याप्रमाणे वाटप करण्यात आले. कुणीही पात्र लाभार्थी धान्य वाटपापासून वंचित राहणार नाही अशा पध्दतीने धान्यवाटपाचे नियोजन करुन वाटप करण्यात येत असल्याचे राजेश ओहाळ यांनी याप्रसंगी बोलताना सांगितले.



# विशेष मिशन इंद्रधनुष लसीकरण मोहीम ५.० यशस्वी करा

## जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**



**धाराशिव :** बालकांमधील मृत्यू व आजारपणाचे प्रमाण कमी करण्यासाठी लसीकरण हे एक प्रभावी साधन आहे. तथापी नुकत्याच झालेल्या सर्वेक्षणात असे आढळून आले आहे, की अर्धवट लसीकरण झालेले, लसीकरण न झालेले बालके ही पुर्ण लसीकरण झालेले बालकांपेक्षा लवकर आजारी पडतात किंवा मृत्यू पावतात. या अनुषंगाने उस्मानाबाद जिल्हयात माहे ऑगस्ट २०२३ पासून तीन फेऱ्यामध्ये विशेष मिशन इंद्रधनुष ५.० लसीकरण मोहिम राबविण्यात येणार आहे. जिल्हयातील एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये यासाठी आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका, नर्सिंग स्टाफ यांच्या मार्फत घरोघरी जावून सर्वे करण्यात आला आहे. लसीकरणाबाबत मोठया प्रमाणात जनजागृती व प्रसिध्दी करण्यात यावी असे निर्देश मा.मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

विशेष मिशन इंद्रधनुष्य ५.० या मोहिमेअंतर्गत झीरो ते दोन वर्ष वयोगटातील लसीकरणापासून वंचित व गळती झालेल्या लाभार्थ्यांचे सर्व लसीद्वारे लसीकरण करण्यात येणार आहे. दोन ते पाच वयोगटातील ज्या बालकांचे गोवर रुबेला लसीचा पहिला दुसरा डोस राहिला असेल, तसेच डीपीटी व ओरल पोलिओ लसीचा बूस्टर डोस राहिला असेल त्यांचेही लसीकरण करण्यात येणार आहे. त्याचबरोबर गर्भवती महिला यांचे लसीकरण कार्यक्रमांतर्गत दिल्या जाणाऱ्या लसीद्वारे लसीकरण करण्यात येणार असून, ६ ऑगस्ट २०१८ किंवा त्यानंतर जन्मलेल्या बालकांचा समावेश करण्यात येणार आहे. तद्नंतर मोहिमे बाबत माहिती देताना जिल्हा प्रजनन व बाल आरोग्य अधिकारी डॉ. कुलदीप मिटकरी यांनी सांगीतले की, या मोहिमेमध्ये लसीकरणापासून वंचित राहिलेले व अर्धवट लसीकरण झालेले गरोदर माता व ० ते ५ वर्ष वयापर्यंतच्या बालकांचा शोध घेवून त्यांना लसीकरण करावयाचे आहे. सर्व आरोग्य संस्थांना यासंबंधित माहिती देण्यात आली आहे आणि आरोग्य संस्थाकडून माहिती घेण्याबाबत कार्यवाही केली व त्यानुसार जिल्हयात एकुण २१५ ठिकाणी सत्र आयोजित करण्यात आले आहेत. त्यामध्ये डोस देण्यात येणारे बालके १३८८ तर गरोदर माता ९५ असे प्रकारे लसीकरण सत्राचे नियोजन शहरी, ग्रामीण आशा दोन्हीं भागात केले आहे. सर्व सत्रे व यु-विन ॲपवर तयार करण्यात येणार आहेत. सदर मोहिम तीन टप्प्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. सदर मोहिम तीन टप्प्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. पहिला टप्पा ७ ते १२ ऑगष्ट २०२३ दुसरा टप्पा ११ ते १६ सप्टेंबर २०२३ - तिसरा टप्पा ९ ते १४ ऑक्टोबर २०२३ या मोहिमेत मोठया प्रमाणात झीरो डोस, सुटलेले व वंचित राहिलेले लाभार्थी असलेले क्षेत्र, गोवर आजारासाठी अतिजोखमीचा भाग, नियमित लसीकरण कार्यक्रमांतर्गत नवीन लसींचा समावेश केल्यानंतर कमी काम असलेले क्षेत्र, जास्त दिवस नियमित लसीकरण सत्र न घेतलेले क्षेत्र, तसेच उपकेंद्र आरोग्य सेविकेचे पद तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधी रिक्त असलेले क्षेत्र, स्थलांतरित होणारा भाग, गोवर-घटसर्प व डांग्या खोकला २०२२-२०२३ या वर्षात उद्रेकग्रस्त भाग, लसीकरणास नकार देणारे व प्रतिसाद न देणारे क्षेत्र यात विशेष मेहनत घेतली जाणार असून, यात लसीकरण करून घेण्यात येणार आहे. असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतिश हरिदास यांनी केले.

## भाकपच्या जनजागरण मोहिमेला परवानगी द्या !

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या महागाई, बेरोजगारी इत्यादी साठीच्या जणजागरण मोहीमेला परवानगी द्या असे आदेश मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद चे न्यायमुर्ती आर जी अवचट साहेब व न्यायमुर्ती संजय ए देशमुख यांच्या खंडपीठाने पोलीस आयुक्त औरंगाबाद यांना दिले आहेत.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या देशव्यापी मोहीमेचा भाग म्हणुन भाकपच्या औरंगाबाद शहर कौन्सिलचे सचिव ॲड अभय टाकसाळ, सहसचिव कॉ. जॅक्सन फर्णांडीस, कॉ अनिता हिवराळे यांनी तीनचाकी वाहनावर लाऊडस्पीकर लाऊन महागाई, बेरोजगारी त्यादी बाबत जणजागरण करण्यासाठी एका गाडीचीच परवानगी मागीतली होती. रहदारीस अडथळा होऊ शकतो या कारणास्तव पोलीस आयुक्तांनी परवानगी नाकारली होती. याविरोधात भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे शहर सेक्रेटरी ॲड. कॉ. अभय मनोहर टाकसाळ यांनी फौजदारी रिट याचीका क्र . 1080/2023 दाखल केली होती.

सदर याचीकेच्या सुनावणीनंतर केलेल्या आदेशात पोलीस आयुक्त कार्यलयाने परवानगी नाकारण्यासाठी दिलेले कारण न पटण्यासारखे, असे मत नोंदवत, सदर कार्यालयाने संबंधित काळासाठी इतर संघटना आणि राजकीय पक्षांनाही परवानग्या दिल्या आहेत असे याचिकाकर्त्यांनी न्यायालयासमोर कागदपत्रे दाखल करुन निदर्शनास आणले. याची दखल घेत खंडपीठाने याचिकाकर्त्याने एका आठवड्याच्या आत अर्ज दाखल करावा व पोलीस आयुक्त कार्यालयाने योग्य त्या अटी व शर्तीसह परवानगी द्यावी असे आदेश दिले.

याचिकाकर्त्यांनी संबंधित विभागात परवानगीसाठी चौकशी केली असता, परवानगी दिली जाईल असे सांगण्यात आले. याचिकाकर्त्यांसाठी न्यायालयात ॲड महेश मुठाळ यांनी काम पाहीले तर पोलीस आयुक्त व पोलीस महासंचालकांची बाजु ॲड एन टी भगत यांनी मांडली.

## 'जो ओबीसी की बात करेगा, वही 'देश पे राज करेगा'

### देशातील ओबीसी समाजात जागृती करणे हेतू आहे : ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे




आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे ८ वे राष्ट्रीय अधिवेशन आंध्रप्रदेश येथील तिरुपती येथे ७ ऑगस्ट रोजी संपन्न झाले. दिवसभर चाललेल्या या महाअधिवेशनात ओबीसी समाजाशी संबंधित ४२ मागण्यांचे ठराव पारीत करण्यात आले.

तिरुपती येथील या महाअधिवेशनाचे उद्घाटन राष्ट्रीय मागास वर्गीय आयोगाचे अध्यक्ष माजी केंद्रीय मंत्री हंसराज अहिर यांच्या हस्ते करण्यात आले. या अधिवेशनाला राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष माजी खासदार हंसराज अहिर, एआयएमआयएम चे अध्यक्ष खासदार असुद्दिन औवेसी, जस्टिस व्ही. ईश्वरय्या, राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकार, आमदार परिनय फूके, आमदार अभिजित वंजारी, आमदार सुधाकर अडबाले, माजी आमदार डॉ. अविनाश वारजुकर, आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे, महासचिव सचिन राजूरकर, राष्ट्रीय समन्वयक डॉ. अशोक जीवतोडे यांची आयोजनात महत्त्वाची भूमिका होती.

'जो ओबीसी की बात करेगा, वही 'देश पे राज करेगा', 'जय ओबीसी', 'जातनिहाय जनगणना झालीच पाहिजे', आदी घोषणांनी महाअधिवेशन गाजले. ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे ध्यक्षस्थानावरून म्हणाले की, दर वर्षी देशाच्या विविध भागात आम्ही ओबीसी महाअधिवेशन आयोजित करतो. अधिवेशन हे केवळ निमित्त मात्र आहे, या माध्यमातून देशातील कानाकोपऱ्यातील ओबीसी बांधावांपर्यंत पोहोचण्याचा हा प्रयत्न असतो. ओबीसी समाजात ऊर्जा व जागरूकता निर्माण करण्याचा हेतू असतो. शेवटच्या श्वासापर्यंत ओबीसी समाजासाठी लढत राहू. राज्याच्या सर्व शाखांमध्ये अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींना लोकसंख्येच्या योग्य प्रमाणात आरक्षण व प्रतिनिधीत्व देण्यासाठी जातनिहाय जनगणना करावी, ४ मार्च २०२१च्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रद्द करण्यात आलेले ओबीसींचे राजकीय आरक्षण पूर्ववत करण्यासाठी घटनेच्या कलमात सुधारणा करावी किंवा २७ टक्के लागू करावे, ओबीसींसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात अर्थसंकल्पात तरतूद करावी आणि स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना करावी, सर्व शासकीय व निमशासकीय संस्थांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, सर्वोच्च न्यायालयाने घातलेली ५०% आरक्षणाची मर्यादा दूर करण्यासाठी घटनादुरुस्ती करावी, क्रिमिलेअरची मर्यादा १३ सप्टेंबर २०१७ पासून वाढलेली नाही, याबाबतची अट मागे घेईपर्यंत मर्यादा २० लाख रुपये करावी, महात्मा फुले दांपत्यांना भारतरत्न द्यावे, ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह आदी अशा ४२ मागण्यांचे बाबतीत महाअधिवेशनात सर्वसंमतीने ठराव घेतले. आता ते केंद्र तथा राज्य सरकारला पाठवून ओबीसी संघटनांद्वारे पाठपुरावा करण्यात येणार आहे. प्रस्तावना राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजूरकर यांनी केले. उपस्थित मान्यवरांनी समोचीत मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष माजी खासदार हंसराज अहिर म्हणाले की, आता पर्यंत मोदी सरकारने ओबीसी समाजाकरीता सकारात्मक योगदान दिले आहे. मी त्यांची स्तुती करत नाही आहे तर मी एका संवैधानिक पदावर आहों, व जवाबदारी ने बोलत आहों, मात्र त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. आम्ही त्यांचे कडून ओबीसी समाजाकरीता अधिक महत्त्वपूर्ण निर्णय घेतील, अशी अपेक्षा व्यक्त करतो. आता पर्यंत ओबीसी समाजाला जे मिळाले आहे त्याचाही विचार आपण करुया. यावेळी बोलताना एआयएमआयएम चे अध्यक्ष खासदार असुद्दिन औवेसी म्हणाले की देशात ओबीसी समाज ५२% पेक्षा अधिक आहे. मात्र आज केवळ ५% सवर्ण समाज बहुसंख्यांक समाजावर अन्याय करीत आहे. न्यायमूर्ती व्ही. ईश्वरय्या म्हणाले की एक दिवस देशाचा पंतप्रधान हा ओबीसी समाजाचा होईल व ओबीसींचे वर्चस्व देशाच्या राजकारणावर असेल.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर